अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
कॉन्टयूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे
साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Help line 9112288611 / 8888982222




संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. २९.०७.२०२५ | अंक नं. १०२ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202



स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉइंट | पॉइंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090



चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
5gm सोन्याच्या सुवर्णखरेदीवर
स्क्रॅचकार्डद्वारे
जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच हमखास मजुरीवर भरघोस डिस्काऊंटही..
चलो दुबई
सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर + 15%* पर्यंत सूट
Conditions Apply*


# नगर-पुणे महामार्गावर वाहनचालकांना लुटण्याचे प्रकार सुरुच

नगर - नगर-पुणे महामार्गावर रात्रीच्या वेळी वाहनचालकांना कोयत्याचा धाक दाखवून लुटमार करण्याच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून २८ जुलै रोजी पहाटेच्या सुमारास कारमधून प्रवास करणाऱ्या बहिण भावाला लुटल्याची आणखी एक घटना नारायणगव्हाण (ता. पारनेर) शिवारात घडली आहे. गेल्या वर्षभरात या महामार्गावर सुपा आणि नगर तालुका पोलिस ठाण्याच्या हद्दीत अशा प्रकारे लुटमार करण्याच्या अनेक घटना घडल्या असून पोलिसांना मात्र या लुटारूंना पकडण्यात अद्यापही यश आलेले नाही. त्यामुळे हा महामार्ग रात्रीच्यावेळी प्रवासासाठी धोकादायक ठरू लागला आहे.

याबाबत पराग प्रकाश जाधव (वय ३०, रा. सुभाषवाडी, चाकण ता,खेड, जि.पुणे) यांनी सुपा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या बहिणीच्या मुलाला नेवासा येथील त्रिमूर्ती विद्यालयात सोडविण्यासाठी फिर्यादी हे त्यांची बहिण कांचन, भाचा कृष्णा यांच्यासह त्यांच्या मित्राच्या टाटा नॅनो कारने (क्र.एम एच ०९ सी एम ०३५४) या महामार्गावरून नगरमार्गे नेवासा येथे जाण्यासाठी निघाले होते. २८ जुलै रोजी पहाटे ४.३० च्या सुमारास नारायणगव्हाण गावच्या शिवारात आल्यावर त्यांच्या गाडीची हेडलाईट अचानक बंद पडली, त्यामुळे त्यांनी नवले वस्ती जवळील हॉटेल शिवतीर्थसमोर कार रस्त्याच्या कडेला उभी करून थांबले असता, तेथे काळ्या रंगाच्या होंडा युनिकॉर्न मोटारसायकलवर आले. त्यांनी फिर्यादी पराग जाधव व त्यांची बहिण कांचन यांना कोयत्याचा धाक दाखवत त्यांच्या

## कोयत्याचा धाक दाखवत बहिण भावाला लुटले

जवळील रोख रक्कम व ६५ हजार रुपये किंमतीची सोन्याची अंगठी बळजबरीने काढून घेतली. फिर्यादीचा मोबाईल हिसकावून घेत तो फोडून टाकला आणि मोटारसायकलवर तेथून ते पसार झाले. या घटनेनंतर फिर्यादी जाधव यांनी सुपा पोलिसांना घटनेची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. त्यानंतर पराग जाधव यांच्या फिर्यादीवरून ३ लुटारुंविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### 'या' परिसरात वारंवार होतेयं लुटमार


नगर- पुणे महामार्ग हा नगर ते बेलवंडी फाटा या अंतरात सुपा आणि नगर तालुका पोलिस ठाण्याच्या हद्दीत आहे. या महामार्गावर नगरच्या पुढे चास गावाजवळ तसेच कामरगाव घाट परिसर, त्यानंतर सुप्याजवळील पवारवाडी घाट, पुढे जातेगाव घाट आणि नारायण गव्हाण गावचे शिवार या परिसरात अनेक लुटमारीच्या घटना घडल्या आहेत. प्रत्येक घटनेत ३ किंवा ४ लुटारू मोटारसायकलवर येतात, कोयत्याचा धाक दाखवतात आणि लुटमार करतात. महामार्गाच्या कडेला गाडी थांबवून, अचानक काही तांत्रिक बिघाड झाल्यामुळे उभ्या केलेल्या वाहनांचे चालक यांनाच या लुटारुंनी आतापर्यंत टार्गेट केले आहे. अनेक गुन्हे केले तरी सुपा व नगर तालुका पोलिस या कोयता गँगला पकडू शकलेले नाहीत.

### पोलिसांना मिळेना सीसीटीव्ही फुटेज

या महामार्गावर अनेक हॉटेल्स, पेट्रोलपंप आहेत. त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरेही बसविण्यात आलेले आहेत. मात्र बहुतांश हॉटेल चालकांनी पोलिसांची झंजट नको म्हणून सीसीटीव्ही कॅमेरे केवळ हॉटेलचा परिसर कव्हर होईल याच हिशोबाने बसविलेले आहेत. महामार्गावरील वाहने या कॅमेऱ्यांमध्ये कव्हर होत नाहीत. त्यामुळे पोलिसांना तपास करताना अडचणी येत असल्याचे पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. पोलिसांना केवळ सुपा टोलनाक्यावरील सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध होते. मात्र हे लुटारू टोलनाक्यापर्यंत जातच नसल्याने पोलीसही हतबल झाल्याचे दिसून येते.

### नगर तालुका व सुपा पोलिसांनी संयुक्त मोहीम राबविण्याची गरज

वाढत्या लुटमारीच्या घटनांमुळे नगर-पुणे महामार्गावरून रात्रीच्या वेळी प्रवास करणे धोकादायक ठरू लागले आहे. त्यामुळे वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण असून या लुटारूंचा बंदोबस्त करण्यासाठी नगर तालुका व सुपा पोलिसांनी संयुक्तपणे कारवाईची मोहीम राबविण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी महामार्गावर रात्रीची गस्त वाढविण्याची मागणीही होत आहे. तसेच वारंवार लुटमार होणाऱ्या काही भागात रात्रीच्या वेळी फिक्स पॉईंट लावण्याचीही आवश्यकता आहे. तरच या घटनांना आळा बसू शकेल, असे पोलिस दलातील जुन्या जाणत्या काही अनुभवी कर्मचाऱ्यांनी सांगितले.


।।दशक्रिया विधी।।

सहवास जरी सुटला, स्मृती सुगंध देत राहील..
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर, आठवण तुमची येत राहील..
कळविण्यास अत्यंत दुःख होत आहे
कै. तुकाराम मथाजी भोसले
यांचे सोमवार दि.२१/०७/२०२५रोजी दुःखद निधन झाले. त्यांचा
।।दशक्रिया विधी।।
बुधवार दि. ३०/०७/२०२५ रोजी सकाळी ०८ वा. होणार आहे
दुःखांकित
श्रीमती. सुनीता तुकाराम भोसले (पत्नी)
काशिनाथ मथाजी भोसले (भाऊ) — सौ. रिचा सिद्धार्थ शिंदे (मुलगी)
जगन्नाथ मथाजी भोसले (भाऊ) — मल्हार तुकाराम भोसले (मुलगा)
संतोष हिरामण भोसले (पुतण्या) — सिद्धार्थ सतिश शिंदे (जावई)
सौ. अनुराधा अनिकेत बुधडे (पुतणी)
समस्त भोसले परिवार
ठिकाण : अमरधाम पिंपळगांव माळवी, ता. जि. अहिल्यानगर
प्रवचनसेवा - ह.भ.प. श्रीकृष्ण रायकर महाराज, पिंपळगाव माळवी


# सराफ बाजार आणि गंज बाजारातील 'अतिक्रमणांवर' त्वरित कारवाई करा

## अन्यथा अहिल्यानगर महापालिकेविरोधात न्यायालयात दाद मागणार

नगर - शहरातील प्रमुख बाजारपेठ असलेल्या सराफ बाजार, गंज बाजार परिसराला अतिक्रमणांचा विळखा पडलेला असून ही अतिक्रमणे तात्काळ हटवून या बाजारपेठेचा श्वास मोकळा करावा, अशी मागणी सराफ, सुवर्णकार व्यापारी संघटनेचे अध्यक्ष प्रकाश लोळगे यांनी महापालिका आयुक्त आणि जिल्हा पोलिस अधिक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. कारवाई न झाल्यास न्यायालयात दाद मागण्याचा इशाराही या निवेदनात देण्यात आला आहे.

या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, सराफ बाजार व गंज बाजार परिसरात अनेक फळ विक्रेते, हळद-कुंकू विक्रेते, कुलूप विक्रेते व इतर दैनंदिन वस्तू विक्रेते यांनी सार्वजनिक रस्ते व फूटपाथवर बेकायदेशीर अतिक्रमण करून व्यवसाय सुरू केले आहेत. यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून सार्वजनिक आरोग्य व कायदा-सुव्यवस्थेचा भंग होत आहे.

या विक्रेत्यांचे संगनमताने चालणारे जाळे असून काही जण रस्त्यावर जागा भाड्याने देतात, बेकायदेशीर वसुली करत आहेत व स्थानिक व्यापाऱ्यांमध्ये दहशत निर्माण करत आहेत. यातील काही विक्रेते स्वतःची दुकाने असतानाही अनधिकृतपणे रस्त्यावर व्यवसाय करत आहेत. या कृतीमुळे कायदेशीर व्यापाऱ्यांना व नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या सर्व अतिक्रमणधारकांवर महाराष्ट्र झोपडपट्टी दादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१, भारतीय न्याय संहिता, २०२३ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २३१ ते २४४ नुसार सार्वजनिक रस्त्यांवरील अतिक्रमण व त्यावरील कारवाई करणे, कलम ३१४ नुसार आयुक्तांना कोणतीही पूर्वसूचना न देता अतिक्रमण त्वरित हटवण्याचा अधिकार आहे. त्यामुळे या सार्वजनिक जागांवरील अतिक्रमण त्वरित हटवले जावे आणि वाहतूक सुरळीत ठेवण्याची व्यवस्था करण्यात यावी. पुन्हा अतिक्रमण होऊ नये म्हणून विशेष पथक तैनात करून नियमित देखरेख ठेवण्यात यावी. याबाबत त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करावी अन्यथा न्यायालयात जाऊन दाद मागावी लागेल, असा इशाराही या निवेदनात देण्यात आला आहे.


देखो अपना देश.. दिलसे, प्यारसे... सम्मान सें !
हायलाईटस् ऑफ केरळ
@ Just 36000
६ दिवस
मुन्नार, पेरियार, अल्लेपी, कोचिन
सर्व समाविष्ट विमान प्रवासासह पुणे ते पुणे
चलो बॅग भरो.. निकल पडो...
राजलक्ष्मी हॉलिडेज्
प्रसाद श्रीकांत मांढरे
98500 63432, 70837 09473



कमी ऐकू येते का ?
signia
Life sounds brilliant...
कंपनीचे अधिकृत विक्रेते
- न दिसणारे डिजीटल श्रवण यंत्र
- ३१ वर्षापासून सेवेत
- इंग्लडमधील अनुभव असलेले ऑडिओलॉजिस्ट
- लहान मुलांच्या तपासण्या
- स्पीच थेरपी
15% Discount
स्थापना : १९९२
साई हिअरिंग क्लिनिक
साई सर्जिकल ॲण्ड हिअरिंग सर्व्हिसेस
कोहिनूर प्लाझा (बेसमेंट), पत्रकार चौक, लोकमत भवन शेजारी, अ.नगर.
मो. 83800 41240
वेळ : सकाळी १० ते सायं. ७ (रविवार बंद)



दर्जेदार व माफक दरात
फ्लेक्स प्रिंटींग
9403232323



PARAS® GROUP
पाहिजेत
अहिल्यानगर येथील पारस या नामांकित उद्योग समुहात काम करण्याची सुसंधी..

कॉर्पोरेट ऑफिस केडगांव
- ॲडमिनिस्ट्रेटिव्ह : ऑफिसर — जागा 1 : किमान 3-5 वर्षे अनुभव आवश्यक तसेच इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असावे. बॅचलर पदवी ( बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन किंवा संबंधित क्षेत्रात)
- HR कोऑर्डिनेटर : (HR Coordinator) — जागा 1 : किमान 2 वर्षे अनुभव आवश्यक बॅचलर पदवी (HR, बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन किंवा संबंधित क्षेत्रात)

एमआयडीसी, अहिल्यानगर
- HR मॅनेजर : जागा 1 : किमान 3 वर्षे अनुभव आवश्यक बॅचलर पदवी (HR, बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन किंवा संबंधित क्षेत्रात)
- ॲडमिन मॅनेजर : जागा 1 : B.Com. किमान 4-5 वर्षे अनुभव आवश्यक
- क्वालिटी सुपरवायझर : जागा 1 : किमान 2 वर्षे अनुभव आवश्यक Bsc. Chemistry/ Physics or Diploma in Mechanical or Production.
- स्टोअर सुपरवायझर : जागा 2 : B.Com. किमान 2 वर्षे अनुभव आवश्यक

भाळवणी इंडस्ट्रीयल एरिया
- स्टोअर सुपरवायझर : जागा 1 : B.com अनुभव : किमान 1-3 वर्षे
- शिफ्ट सुपरवायझर : जागा 1 : Graduation. अनुभव : किमान 1-3 वर्षे
- डिस्पॅच सुपरवायझर : जागा 1 : 12वी / Graduate अनुभव : किमान 1-3 वर्षे

(भाळवणीसाठी केडगाव ऑफिस मधून बस सुविधा उपलब्ध )
इच्छुक उमेदवारांनी आपल्या सविस्तर अर्ज-बायोडाटासह सकाळी 11 ते सायं. 6 यावेळेत खालील पत्त्यावर समक्ष भेटावे.
पगार : योग्यतेनुसार । शनिवार : बंद
पारस ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज
प्लॉट क्र. 31 ते 40, इंडस्ट्रीयल इस्टेट, नगर-पुणे रोड, केडगांव, अहिल्यानगर 414005
jobs@parasgroup.com | 8806719666 / 8007900743



आसाम चहा मध्ये आम्ही इतर कोणताही हलका चहा पावडर मिक्स करत नाही
रत्नकमल™ चहा
ब्रँडेड कंपनीचा चहा व रत्नकमल चहा
एक वेळेस जरूर तुलना करून पहा
आशिष ट्रेडर्स चहा पावडरचे ठोक व किरकोळ विक्रेते
रत्नकमल, बुरुड गल्ली, मारुती मंदिरासमोर, अहिल्यानगर- ४१४००१
Contact : 8767369367



वाढदिवस आपला आमच्या मनात लिहीला आहे
प्रत्येक दिन आपणास शुभेच्छा देत आहोत...
Happy Birthday

आमचे मित्र
राजुभाऊ दाभाडे
हॅलो 9420005555
8329297771
यांना
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
राजुभाऊ दाभाडे
मित्र परिवार

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# ज्यादा परताव्याच्या आमिषाने व्यावसायिकाची ८० लाखांची फसवणूक; जगताप पती पत्नीसह चौघांविरूध्द नगर मध्ये चौथा गुन्हा झाला दाखल

नगर - कंपनीमध्ये गुंतवणूक केल्यास जादा परतावा देण्याचे आमिष दाखवून एमआयडीसीतील एका व्यावसायिकाची ८० लाख रुपयांची फसवणूक झाली असल्याचे समोर आले आहे. राजेश ब्रिजलाल बन्सल (वय ५५, रा. सावेडी, अहिल्यानगर) असे फसवणूक झालेल्या व्यावसायिकाचे नाव असून त्यांच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात २८ जुलै रोजी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे या आरोपींच्या विरोधात नगरमध्ये फसवणुकीचा हा चौथा गुन्हा दाखल झाला आहे.

राहुल दर्शन जगताप, त्याची पत्नी एंजल ऊर्फ पायल सॅम्युयल ऊर्फ स्नेहल जगताप, आई सुशिला जगताप व ईब्राहीम सॅम्युयल (सर्व रा. सानपाडा, नवी मुंबई) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. यातील फिर्यादी राजेश बन्सल यांचे एमआयडीसी येथे अनुराज मोटर्स या नावाने व्हॉल्वो, आयशर या कंपनीचे ट्रक्स व बसेस खरेदी-विक्रीचे शोरूम आहे. ते व्हॉल्वो आयशर कंपनीचे जिल्ह्याचे अधिकृत विक्रेते आहेत. अहिल्यानगर-पुणे महामार्गावरील छत्रपती मोटर्स प्रा.लि. अधिकृत डिलर अनुज अनिल मित्तल हे त्यांचे मित्र आहेत. मित्तल यांनी १२ ऑगस्ट २०२४ रोजी सावेडी मधील एका हॉटेलमध्ये त्यांच्या ओळखीचे राहुल दर्शन जगताप (रा. सानपाडा, नवी मुंबई) याची ओळख करून दिली. त्यावेळी राहुल जगताप व त्याचे बरोबर त्याची पत्नी एंजल राहुल जगताप ही देखील होती. त्यांनी रिजाईस इव्हेंट ऑर्गनायझेशन नावाची कंपनी असून ही कंपनी मेक माय ट्रीप या मोठ्या कपंनीची प्लॉटीनम होल्डर आहे, असे सांगितले. मेक माय ट्रीप या कंपनीची वेबसाईट दाखविली, त्यामध्ये त्यांच्या रिजाईस इव्हेंट ऑर्गनायझेशन या कंपनीचा प्लॉटीनम होल्डर असा उल्लेख होता. कंपनीबाबत इतर माहिती नमूद केलेली होती.

रिजाईस इव्हेंट ऑर्गनायझेशन कंपनीत गुंतवणूक केल्यास त्यावर ज्यादा परतावा देण्याचे आमिष या दोघांनी दाखविले. त्यांच्यावर विश्वास ठेवून फिर्यादी यांनी २० ऑगस्ट २०२४ पासून ते ६ सप्टेंबर २०२४ पर्यंत वेळोवेळी पैसे पाठविले. परंतु, ज्यादा परतावाही मिळाला नाही. गुंतवणूक केलेली रक्कमही मिळाली नाही. जगताप याने फसवणूक केल्याची खात्री झाल्यावर आणि याबाबत अनुज मित्तल यांनी याबाबत भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असल्याचे समजल्यावर बन्सल यांनी पोलिस अधिक्षक कार्यालयात तक्रार केली होती. त्यानंतर २८ जुलै रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे, त्यानुसार राहुल दर्शन जगताप, त्याची पत्नी एंजल, आई सुशिला जगताप व ईब्राहीम सॅम्युयल (सर्व रा. सानपाडा, नवी मुंबई) या चौघांविरूध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## यापूर्वी आरोपींविरुद्ध ३ गुन्हे दाखल

या आरोपींनी नगरमधील अनेक व्यावसायिकांना अशाप्रकारे फसविलेले असून त्यांच्या विरुद्ध भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात १ तसेच तोफखाना पोलिस ठाण्यात व्यावसायिक तरुणीची ३० लाखांची फसवणूक केल्या प्रकरणी एक आणि एका व्यावसायिकाची २४ लाख ७० हजारांची फसवणूक केल्याचा एक असे दोन गुन्हे दाखल झालेले आहेत. आता आणखी एका व्यावसायिकाची ८० लाखांची फसवणूक झाल्याचा चौथा गुन्हा एमआयडीसी पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. यापूर्वीच ३ गुन्हे दाखल झालेले असले तरी त्या गुन्ह्यांच्या तपासात काहीही प्रगती झालेली नाही, त्यामुळे हे गुन्हेगार अद्यापही मोकाट फिरत असल्याचे चित्र आहे. आता चौथा गुन्हा दाखल झाला असून आता तरी पोलिस या आरोपींच्या मुसक्या आवळणार का? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
'मुसाफिर' - ९८२२०२०६९१

### सुरेश भट व आशाताईंचे...भोगले जे दु:ख...

काही काही प्रसंग, कृती विचीत्र योगायोग ठरतात जणू! आता हीच गझल पहा ना. हृदयाला हात घालणारी. घालमेल करवणारी. निदान प्रत्येक सृजनशील व मराठी रसिकाला ही गझल आपलीच व्यथा वाटेल!



**'भोगले जे दु:ख त्याला**
**सुख म्हणावे लागले**
**एवढे मी भोगिले की मज हसावे लागले।**
**पण दुजांच्या आसवानी मज भिजावे लागले।।**
**ठेविले अजन्म डोळे आपुलेही कोरडे**
**पण दुजांच्या आसवांनी मज भिजावे लागले ।।'**

श्रेष्ठ मराठी गझलकार सुरेश भटांनी आपल्या श्रीमंत व समृद्ध शब्दांतून आशाताईंचा जीवनपटच उलगडलाय जणू.

श्रीधर फडक्यांनी आशाताईंना जेव्हा याची चाल ऐकवली तेव्हा आशाताईंच्या दुखऱ्या हृदयात वेदनेची वीणा झणकारली असेल अन् मग तयार झाली ही अवीट गोडी व वेदनादायी पण हवहवींशी गझल.

कदाचित वैयक्तिक, सांसारिक यशापयशाच्या आशा निराशांची मालिकाच त्यांच्यापुढे उभी राहिली असेल. व्हायोलियनची तान (सूर) या गाण्याला अधिकच आर्त बनवते.

आशाताईंबद्दल आपण काय बोलणार. सर्व प्रकारची गाणी त्यांनी लिलया गायली. मग ते भक्तीगीत असो वा प्रेमगीत, गझल असो वा कॅब्रेगीत, युगल गीत असो वा उमराव जान सम आर्त हाक.

आमचे आवडते रसिक व लेखक स्व. द्वारकानाथ म्हणायचे, ''सूर लावून गाणं म्हणणं हा संगीताचा नियम झाला. तसं सगळेच करतात. पण 'जीव' लावून गाणं हेच महत्त्वाचं आहे. 'आशा' वरील गझलेप्रमाणे नेहमी जीव लावून गायलीय.''

**एकदा केव्हा तरी मी वचन कवितेला दिले**
**राखरांगोळीस माझ्या गुणगुणावे लागले...**
**भोगले जे दु:ख त्याला सुख म्हणावे लागले...**

# मनपाकडूनकडून बाजारपेठेतील गाळ्यांची अन्यायकारक भाडेवाढ

### भाडेवाढ रद्द करा : व्यापाऱ्यांची पालकमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

नगर - महापालिका प्रशासनाने जुने दाणे डबरा व गंजबाजार येथील महापालिका मालकीच्या गाळ्यांची केलेली भाडे वाढ अन्यायकारक असून ती तातडीने रद्द करण्याचे आदेश महापालिका प्रशासनाला देण्यात यावेत अशी मागणी या परिसरातील गाळे धारक व्यापाऱ्यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



मनपाच्या जुने दाणे डबरा व गंजबाजार गाळे भाडे वाढीबाबत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या जनता दरबारात निवेदन देताना भाजपा व्यापारी आघाडीचे शहर जिल्हाध्यक्ष महेश गुगळे, समवेत धनंजय जाधव, नीरज राठोड, हर्षल बोरा, हेमंत पवार, आनंद लहानमगे, सुरेश लालबागे यांच्यासह व्यापारी.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या जनता दरबारात भाजपा व्यापारी आघाडीच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष महेश गुगळे यांनी मनपाच्या जुने दाणे डबरा व गंजबाजार, गाळे भाडे वाढीबाबत पालकमंत्री विखे यांना निवेदन दिले. यावेळी धनंजय जाधव, नीरज राठोड, हर्षल बोरा, हेमंत पवार, आनंद लहानमगे, सुरेश लालबागे यांच्यासह दुकानदार, व्यापारी उपस्थित होते

या निवेदनात म्हटले आहे की, नगर महापालिकेने जुने दाणे डबरा व गंजबाजार येथील गाळ्यांची अतिशय अन्यायकारक पद्धतीने भाडे केली असून गाळेधारकांकडून अवाजवी भाडे आकारणी झालेली आहे. सदर आकारणी रद्द करण्यात यावी तसेच या गाळ्यांची मालकी महापालिकेची असल्याने गाळे धारकांकडून घरपट्टी व इतर कर घेवू नये. ६ नोव्हेंबर २०२३ चे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, क्र. ४१८ नुसार नवीन भाडे आकारणी करण्यात यावी, सन २०१६-१७ साली जे मुळ भाडे आकारणी होती व त्यानंतर करण्यात आलेले भाडे वाढ ह्यात फार मोठी तफावत आहे व ती दुरुस्त करण्यात यावी, २०/०७/२०१८ रोजी झालेल्या महासभेत प्रस्ताव क्र. ३ मध्ये गाळे धारकांचे भाडे वाढ रद्द करणेबाबत सविस्तर चर्चा होऊन सदरचा निर्णय झालेला असताना त्याच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही.

सदर गाळे धारक अंदाजे ५० वर्षापुर्वीचे जुने आहे त्याचाही विचार करावा, असे निवेदनात म्हटले आहे.



### राजेश देशपांडे यांना डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी मेमोरियल पुरस्कार प्रदान

अहिल्यानगरचे गुंतवणूकतज्ञ राजेश देशपांडे यांना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, केंद्रीय मंत्री नारायण राणे, शिवसेनेच्या शायना एन सी व अभिनेता सोनू सूद यांच्या उपस्थितीत मोस्ट इन्स्पायरिंग पर्सनॅलिटी इन फिनान्शियल लिटरसी हा नॉच फाउंडेशनचा डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी मेमोरियल पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## हद्दपारी आदेशाचा भंग करून शहरात वास्तव्य करणाऱ्या आरोपीला पकडले

नगर - हद्दपारी आदेशाचा भंग करून शहरात वास्तव्य करणाऱ्या एकाला तोफखाना पोलिसांनी पाईप लाईन रोडवरील वाणीनगर येथील कमानीजवळ २८ जुलै रोजी दुपारी पकडले. योगेश नागनाथ पोटे (वय ३०, रा. काळुबाई मंदिराजवळ, वाणीनगर, पाईपलाईन रोड, सावेडी) असे पकडलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, योगेश पोटे हा २८ जुलै रोजी दुपारी ३.४० वाजण्याच्या सुमारास वाणीनगर कमानीजवळ फिरताना आढळून आला. पोलिसांनी त्यास थांबवून विचारणा केली असता त्याने स्वत:ची ओळख पटवून दिली. पुढील चौकशीत त्याच्याकडे हद्दपारी दरम्यान जिल्ह्यात येण्यास कोणतीही अधिकृत परवानगी नसल्याचे निष्पन्न झाले. योगेश पोटे यास उपविभागीय अधिकारी, अ.नगर यांच्या आदेशानुसार २३ एप्रिल २०२५ पासून पुढील ६ महिन्यांसाठी जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलेले आहे.

या प्रकरणी पो. कॉ. आकाश काळे यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन योगेश पोटे याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम १४२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शेअर ट्रेडिंगमध्ये नफ्याच्या अमिषाने ४७ लाखांची फसवणूक करणाऱ्या गुजरातच्या ४ आरोपींना सायबर पोलिसांनी पकडले

नगर - आयसी ग्रुप गोल्ड स्टॉक क्लब ए ५ या व्हॉट्सप ग्रुपच्या माध्यमातून शेअर ट्रेडिंगमध्ये अधिक नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका नागरिकाची तब्बल ४७ लाख ३ हजार ५४३ रुपयांची फसवणूक करणाऱ्या गुजरात राज्यातील चौघा आरोपींना नगरच्या सायबर पोलिसांनी अटक केली आहे.

या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली होती. १९ जून २०२४ ते ११ जुलै २०२४ या कालावधीत फिर्यादी यांना व्हॉट्सप ग्रुपच्या ॲडमिन अनिका शर्मा हिने शेअर ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक केल्यास अधिक नफा मिळतो, असे सांगून त्यांच्या विश्वासाला तडा देत फसवणूक केली. या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी यांनी फसवणूक झालेल्या रकमांचे व्यवहार कोटक महिंद्रा बँक व एचडीएफसी बँक या बँकांमधून केले होते. सायबर पोलिसांनी संबंधित बँक खात्यांचे तांत्रिक विश्लेषण व केवायसी तपासणी केली असता सदर बँक खाती जावेदभाई सुमारा व जिग्नेश कलसरिया यांच्या नावावर असल्याचे निष्पन्न झाले.



शेअर ट्रेडिंगमध्ये नफ्याच्या अमिषाने ४७ लाखांची फसवणूक करणाऱ्या गुजरातच्या ४ आरोपींना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत सायबर पोलिसांचे पथक.

तपासादरम्यान हेही स्पष्ट झाले की, महादेव गेडीया व रवी आजगिया या दोघांनी जिग्नेश कलसरिया याला फसवणूक करण्यासाठी बँक खाते उघडण्यास मदत केली होती. सायबर पोलिसांनी याप्रकरणी जावेदभाई मोहम्मदभाई सुमारा (वय ४०, रा. काजली गाव, ता, वेरावल, जि. गिर सोमनाथ, गुजरात), जिग्नेश मोहनभाई कलसरिया (यय २७, रा. सनोसरी, ता. गिरगढडा, जि. गिर सोमनाथ, गुजरात), महादेव जसुभाई गेडीया (वय ३०, रा. शांती विहार सोसायटी, पर्वत पटिया, सुरत, गुजरात) व रवी रामाजीभाई आजगिया (वय ३६, रा. शिवदर्शन सोसायटी. कतार ग्राम, सुरत, गुजरात) यांना अटक केली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक मोरेश्वर पेंदाम, उपनिरीक्षक सुदाम काकडे, अंमलदार अभिजीत अरकल, मोहम्मद शेख, अरुण सांगळे, गणेश पाटील, अप्पासाहेब हिंगे, तसेच महिला अंमलदार सविता खताळ यांच्या पथकाने केली आहे.

# दिल्लीगेट मारहाण प्रकरणी टोळक्यावर खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल

नगर - मागील भांडणाच्या कारणावरुन १५ ते २० जणांनी ८ जणांना घातक शस्त्राने मारहाण करुन खुनाचा प्रयत्न केल्याची घटना २४ जुलै रोजी दुपारी २.३० वाजण्याच्या सुमारास शिशु संगोपन शाळा चितळेरोड, गोगादेव मंदिरशेजारी दिल्लीगेट व नालेगाव येथे घडली होती. या प्रकरणी २८ जुलै रोजी तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रोहन जयेंद्र चव्हाण (वय २७, रा. मुन्सिपल कॉलनी, दिल्लीगेट) याने तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यामध्ये म्हंटले आहे की, आरोपी पवन दीपक पवार, शिवम दीपक पवार, आदित्य लहू सकट, आदर्श रमेश साळुंखे, हर्षल लक्ष्मण सारसर, अमोल उर्फ भैय्या गोरे, किरण बापू जरे, चेतन रवींद्र निंदाणे, राहुल अंबादास रोहकले, आयान शेख, यश प्रदीप पवार (सर्व राहणार मुन्सिपल कॉलनी, दिल्ली गेट, नालेगाव), प्रशांत प्रदीप दळवी (वारुळाचा मारुती नालेगाव), गणेश संतोष भुजबळ (दातरंगे मळा, नालेगाव) यांच्यासह अनोळखी पाच ते सहा यांनी मागील भांडणाच्या कारणावरुन न्यायालयात झालेल्या शिक्षेच्या कारणावरुन लोखंडी रॉड, लाकडी दांडके व धारदार शस्त्रे घेऊन फिर्यादी यांच्या कुटुंबीयांवर हल्ला करुन शिवीगाळ दमदाटी करीत बेदम मारहाण करुन खुनाचा प्रयत्न केला. या मारहाणीत फिर्यादी, फिर्यादीची आत्या, फिर्यादीचे चुलते जितेंद्र चव्हाण, प्रियंका कांबळे, फिर्यादीची पत्नी नीलम चव्हाण, अनिता चव्हाण, देवयानी हंस, संगीता दीपक पवार हे गंभीर जखमी झाले.

याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात रोहन चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन १५ ते २० जणांविरुद्ध बीएनएस कलम १०९ (१), १२६ (२), ११८ (१), १८९ (२), (३), १९०, ३३३, ३२४ (४) (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गोंटला हे करीत आहेत.



### झोक्याला महत्व...

आज नागपंचमीचा सण ग्रामीण भागात झाडाला दोरखंड बांधुन झोका खेळला जातो पण शहरात मात्र बागेतील लहान मुलांच्या झोक्यावर महिलांनी झोका खेळुन आनंद लुटला बुऱ्हाणनगर येथील श्रीराम उद्यानातील हे दृश्य. (छाया- विजय मते)

## चंद्रकलाबाई कटारिया यांचे अल्प आजाराने निधन

नगर - येथील श्रीमती चंद्रकलाबाई नवनीतलाल कटारिया (वय ७४) यांचे २८ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांचे देहदान विळद हॉस्पिटलमध्ये तर नेत्रदान पुणे येथील देसाई हॉस्पिटलमध्ये करण्यात आले. त्यांच्यामागे ३ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.



त्या नगर अर्बन बँकेचे माजी संचालक तसेच राज टेक्सटाईल्स्चे संचालक राजेंद्र गांधी (वाळवणावाला) यांच्या मोठ्या बहीण होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## सराईत गुन्हेगाराला २ वर्षांसाठी केले जिल्ह्यातून हद्दपार

नगर - वारंवार गुन्हेगारी कृत्य करून नागरिकांमध्ये भीती निर्माण करणाऱ्या सराईत गुन्हेगारावर जिल्ह्यातून २ वर्षांसाठी हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे. जाबीर सादीक सय्यद (रा. घर क्र. ई / ६, शहा कॉलनी, गोविंदपुरा, अ.नगर) असे या गुन्हेगाराचे नाव आहे.

त्याच्या गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यासाठी भिंगार कॅम्प पोलीसांनी त्याच्या हद्दपारीचा प्रस्ताव प्रांताधिकारी सुधीर पाटील यांच्याकडे मंजुरीसाठी सादर केला होता. तो मंजूर करण्यात आला असून या आदेशाची तातडीने अंमलबजावणी करत पोलिसांनी मुकुंदनगर परिसरातून या गुन्हेगारास ताब्यात घेण्यात आले व त्याला जिल्ह्याच्या हद्दीबाहेर सोडण्यात आले आहे. ही कारवाई सहायक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर, पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे, पोलीस अंमलदार रेखा पुंड, किरण बर्वे, ईसराईल पठाण, पांडुरंग बारगजे, दिपक शिंदे, रवि टकले यांनी केली आहे.

# लहुजी शक्ती सेनेच्या ज्येष्ठ व माजी पदाधिकाऱ्यांचे सामुहिक राजीनामे; नवीन पदाधिकारी निवडताना विश्वासात घेतले जात नसल्याचा आरोप

नगर - नवीन पदाधिकारी निवडताना ज्येष्ठ व माजी पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेतले जात नसल्याचा आरोप करुन लहुजी शक्ती सेनेच्या ज्येष्ठ व माजी जिल्हा व तालुका पदाधिकारी यांनी सामुहिक राजीनामे दिले. नुकतीच जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांची शासकीय विश्रामगृह येथे बैठक पार पडली. यावेळी सर्व माजी पदाधिकाऱ्यांनी राज्य कार्यकारिणी सदस्य ज्ञानेश्वर जगधने यांच्याकडे राजीनामे सुपुर्द केले. अनेक वर्षापासून संघटनेचे प्रामाणिकपणे काम करणाऱ्यांना डावलून नवीन कार्यकर्त्यांना पदे देण्याचे काम सुरु असल्याचा आरोप उपस्थितांनी केला.



संस्थापक अध्यक्ष विष्णूभाऊ कसबे व प्रभारी प्रदेशाध्यक्ष कैलास खंडारे यांच्या उपस्थितीमध्ये जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली.

संस्थापक अध्यक्ष विष्णूभाऊ कसबे व प्रभारी प्रदेशाध्यक्ष कैलास खंडारे यांच्या उपस्थितीमध्ये काही दिवसांपूर्वी जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. यामध्ये संघटनेची जिल्हा कार्यकारिणी बरखास्त करुन नवीन पदाधिकारी निवडण्याचे सूचविण्यात आले होते. मात्र नवीन पदाधिकाऱ्यांची निवड जुने व ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन होत नसल्याने नाराज झालेल्या पदाधिकाऱ्यांनी राजीनाम्याचे अस्त्र उगारले आहे.

जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे, युवा जिल्हाध्यक्ष आप्पा रोकडे, कर्जत तालुका अध्यक्ष लक्ष्मण निक्षे, पाथर्डी तालुका अध्यक्ष सिताराम शिरसाठ, नेवासा तालुका अध्यक्ष किरण कणगरे, पारनेर तालुका अध्यक्ष कृष्णा शेलार, अहिल्यानगर शहराध्यक्ष संतोष उमाप, जिल्हा कार्याध्यक्ष राजाराम काळे, श्रीगोंदा तालुकाध्यक्ष नवनाथ शिंदे, पारनेर महिला तालुकाध्यक्षा राणी उमाप, कर्जत महिला तालुकाध्यक्षा सुनीता भवाळ, श्रीगोंदा कार्याध्यक्ष बाळासाहेब बुलाखे, रामदास मोरे, वसंत औचिते, प्रवीण शेंडगे, संतोष शेंडगे, मधुकर सकट, पुष्पा शेंडगे, दत्ताभाऊ शिंदे, तेजस अवचर, लखन साळवे यांनी संघटनेच्या सदस्यपदाचे राजीनामे दिले.

जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे म्हणाले की, माजी व ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन नवीन पदाधिकाऱ्यांची निवड होणे अपेक्षित आहे. मात्र ज्यांनी संघटना वाढविण्यासाठी अहोरात्र काम केले त्यांना डावलून नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या परस्पर होत असेल, तर ते चुकीचे आहे. संघटनेच्या राज्य पदाधिकाऱ्यांनी या भावना लक्षात न घेतल्यास समाजाचा मेळावा घेऊन इतर संघटनेत जायचे की, स्वतंत्र संघटना निर्माण करायची याबाबत निर्णय घेतला जाणार असल्याचा इशारा त्यांनी दिला.

युवा जिल्हाध्यक्ष आप्पा रोकडे म्हणाले की, ज्येष्ठ व माजी पदाधिकाऱ्यांनी गावागावात जाऊन जिल्ह्यात संघटना वाढविण्याचे काम केले आहे. या पदाधिकाऱ्यांच्या भावना समजावून न घेतल्यास वेगळ्या माध्यमातून जावे लागणार असल्याचा इशारा त्यांनी दिला. राज्य कार्यकारिणी सदस्य ज्ञानेश्वर जगधने यांनी राजीनामे दिलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या भावना वरिष्ठांपर्यंत पोहोचविणार असून, माजी पदाधिकाऱ्यांवर अन्याय होत असताना यातून सकारात्मक मार्ग काढला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# गृहिणी

## आरोग्य

### सफरचंद खाण्याची योग्य वेळ

✽ सकाळी नाश्ता करताना सफरचंद खाणे सर्वात योग्य ठरेल. यात पेक्टिन नामक तत्त्व आढळते ज्यामुळे बीपी लेवल लो होते आणि कोलेस्टरॉल कमी करण्यात देखील मदत करते. सफरचंद रात्री खाणे टाळावे कारण हे पचण्यात कठिण जाते आणि याने ॲसिडीटीचा त्रास उद्भवू शकतो.

✽ तणावपूर्ण वातावरण, अपेक्षांचे ओझे, घरच्यांकडून उपेक्षा व धावपळीचे जग यामुळे आज एका नवीन समस्येला जगाला तोंड द्यावे लागत आहे. ती म्हणजे निद्रानाश (झोप न येणे). या आजारावर सहज घरी करण्याजोगे उपाय आपण बघूया. उपाय - १. नियमित व्यायाम केल्याने शरीराचे रक्ताभिसरण व्यवस्थित राहते व त्यामुळे झोप येते.

२. देवाची प्रार्थना केल्यास मन शांत होते व व्यवस्थित झोप येते. ३. रात्रीचे जेवण हलके घ्यावे व जास्त पाणी पिऊ नये. ४. अति तिखट, मसालेदार, मांसाहारी पदार्थ खाणे टाळावे.

## पाककला

### डिंक मिक्स

**साहित्य :** १ किलो लोणी, खसखस, खारीक पूड, बदाम पूड, खडीसाखर, खोबऱ्याचा कीस, सुंठपूड, तयार डिंक पूड.

**कृती :** डिंकपूडीचे दोन भाग करावे. निम्मी साजूक तुपात भाजून घ्यावी व निम्मी तशीच ठेवावी. खोबऱ्याचा कीस, खसखस भाजून घ्यावे. लोणी कढवत ठेवावे. त्यात भाजलेली डिंक पूड, खारीक पूड, बदामपूड, खडीसाखर, भाजलेला खोबऱ्याचा कीस आणि सुंठ पूड घालावी. हे मिश्रण राहिलेल्या निम्म्या डिंकपूडीवर ओतावे त्याबरोबर डिंक फुलून येईल. लगेच तो बरणीत भरावा. ह्या डिंकात औषधी गुण तयार होतात. बाळंतिणीला हा डिंक चांगला असतो.

## सल्ला

✽ स्वयंपाक घरातील स्टीलची बेसिन्स खूपदा मळगट दिसू लागतील तेव्हा घासणीने घासावे.

✽ वापरलेली चहाची पावडर फेकून न देता ती गुलाबाच्या रोपट्याच्या कुंडीत वाळवून टाकावी. खतासारखा उपयोग होतो.

## वास्तू

✽ घरात ज्या स्थानावर कृष्णाचा फोटो असतो तिथे सकारात्मक ऊर्जेचा प्रवाह असतो. वास्तूनुसार घरात जर आपण वासुदेवाने कृष्णाला टोकरीत नेतानाचा फोटो लावावा. यामुळे बऱ्याच अडचणी कमी होतात.

## सौंदर्य

✽ हाताच्या कोपऱ्यांचा व गुडघ्याचा काळेपणा दूर करण्यासाठी त्या भागावर ग्लीसरीन लावावे. कोमट पाण्यात जाडसर कपडा भिजवून त्याने रगडावे.

✽ जर आपली त्वचा आमली असेल तर बेसनासारखी दुसरी वस्तू नाही. गुलाबपाण्यात बेसन मिसळून उटणे तयार करा. चेहऱ्यावर व शरीरावर लावा. नंतर स्नान करा. अत्यंत उत्साही तर वाटतेच परंतु सुगंधही येतो.

✽ हिवाळ्यात तहान असो किंवा नसो, पाणी वेळोवेळी पिणे आवश्यक आहे. असं केल्याने ओठ मऊ राहतात आणि कोरडेपणा देखील नाहीसा होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. ३० जुलै २०२५

**श्रियाळ षष्ठी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, श्रावण शुक्लपक्ष, हस्त २१।५३, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३१ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : मंगळाचेच घनिष्ठा नक्षत्र आज प्रभावी असल्याने कार्यक्षेत्रात आपण उत्तम कामगिरी दाखवाल. आपले नेतृत्वगुण, हिंमत व मेहनती स्वभाव आपणास निश्चितच चांगले फळ देईल.

**वृषभ** : भागीदारी व्यवसायात लाभ होतील. जोडीदाराच्या नक्षत्रातील राशीस्वामीचे अष्टमातील भ्रमण आपणास सध्यातरी महत्वपुर्ण निर्णय घेण्यास लगाम लावत आहे.

**मिथुन** : संध्याकाळी साडेसात पर्यंत तरी वाहने जपून चालवावीत. वादविवाद टाळावा. कामावर लक्ष केंद्रीत करून हातातील काम पुर्ण करण्याकडे लक्ष द्यावे.

**कर्क** : भाग्याची साथ लाभेल. आपण घेतलेले निर्णय फायदेशीर ठरतील. जुने मित्र मंडळी भेटतील. दिवस अत्यंत आनंददायी वातावरणात व्यतीत होईल.

**सिंह** : वाहन जपून चालवावे. आरोग्याची काळजी घ्यावी. नियोजनपूर्वक कृती करावी. कुणाच्या वादात पडू नये. आपले काम मेहनत व सातत्य राखून पार पाडावे.

**कन्या** : पंचमातील बुध असंगत आहे. सध्या तरी कामाच्या नियोजनावर भर द्यावा लागेल. दिवस सकारात्मक असेल. वाहनपिडा सतावेल.

**तूळ** : प्रॉपर्टी संदर्भात कार्य फायदेशीर ठरतील. घरात आनंदी वातावरण असेल. जळवचे प्रवासाचे बेत आखाल. छोट्या-मोठ्या दुखापती उदा. कापणे, चिरणे आदींचा संभव आहे.

**वृश्चिक** : जुनी येणी वसूल होईल. आर्थिक कामात उन्नती साधाल. बौध्दिक कामात यश लाभेल. वाहन सावकाश चालवावे.

**धनु** : कार्यक्षेत्रात नावलौकिक वाढेल. व्यवहार फायदेशीर ठरतील. भागीदारीत फायदा होईल मात्र संगनमत ठेवावे लागेल. मागील परिश्रम फळास येतील.


**मकर** : मानसिक स्थिती सांभाळून शांततेत निर्णय घ्यावे. भागीदारी व्यवसायात लाभ होऊ शकतो. मागील उधारी वसुल होईल. स्थावर जंगम मालमत्तांचे व्यवहार करा.

**कुंभ** : वैवाहिक जोडीदाराच्या आरोग्याची काळजी घ्यावी. अनावश्यक खर्च होऊ शकतो. व्यवहार काळजीपुर्वक करावे. मातृ-पितृ चिंता सतावेल.

**मीन** : दिवस आनंदी असेल. हाती घेतलेले काम उत्तमरित्या पुर्ण करू शकाल. सकारात्मक दिवस ठरेल. पुर्वसुकृत आज फळास येईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२३१ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२३० चे उत्तर



**उभे शब्द :-** १) संतोष; शंकानिवृत्ती; तृप्ती ४) अथवा; किंवा ७) भाजी वगैरे चिरण्याचे एक हत्यार ८) जड; पत असलेला; प्रतिष्ठित १०) एक प्रकारचे तलम सुती कापड ११) केस काळे करण्याचे रसायन १२) कट; कपट; कारस्थान १४) दहीहंडीतील विविध पदार्थांचे मिश्रण १५) रिवाज; पद्धत; तहा १७) कागदाचा चतुर्थांश स्तंभ १८) मोठा आवाज; स्फोट; बंदुकीची दारू १९) ओझे; वजन २१) अंथरण्याचे एक जाड वस्त्र २२) जमीन लिंपण्याचा प्रकार

**आडवे शब्द :-** १) भास्कर; रवि; सूर्य; दिनकर २) बागकाम करणारा; फुलधर; बनकर ३) आश्चर्य; आश्चर्यकारक रीतीने ४) अग्नी ५) बजरंगबलीचे आयुध ६) रड, रडगाणे ९) बस्तान १०) घाण; विष्ठा ११) कला जाणणारा; आर्टिस्ट १२) कपटी; कारस्थानी १३) भास्कर; रवि; सूर्य १४) व्यवस्थापक; कारभार पाहणारा १६) अंदाज; अनुमान; कयास २०) अग्नीतून निघणारा काळसर वायू २१) माहिती; ज्ञान

# ✽ ✽ ✽ ✽ ✽ ✽ मुलांचे विश्व ✽ ✽ ✽ ✽ ✽ ✽

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : अपयश नव्हे; पण निकृष्ट प्रतीचे ध्येय हाच गुन्हा आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### विमानात मैल्याची विल्हेवाट कशी लावतात?

बसच्या प्रवासात केव्हातरी तुमची 'तशी' गडबड झालीच असेल निदान तुमच्या बरोबरच्या कोणाला तरी त्रास झालाच असेल. चालू बसमध्ये शौचास लागल्यास प्रचंड गोंधळ होऊ शकतो. कंडक्टरला विनवण्या करून एखाद्या स्टॉपवर गाडी जास्त वेळ थांबवावी लागते. तिथल्या तुटपुंज्या सोयींचा वापर करून धावतपळत गाडीत यावे तर प्रवाशांच्या त्रासिक नजरांना व प्रसंगी टोमण्यांनाही सामोरे जावे लागते. आपण अगदी शरमून जातो. याऊलट रेल्वेचा प्रवास याबाबतीत खूपच सोयीचा असतो; परंतु मैल्याच्या विल्हेवाटीची ही पद्धतही आरोग्याच्या दृष्टीकोनातून योग्य नसते. विष्ठा सरळ रेल्वेच्या रूळामधील जागेत पडत असल्याने माती व पाणी यांचे प्रदूषण होतेच. विमानामध्ये मैल्याच्या विल्हेवाटीची काय व्यवस्था असेल? हा प्रश्न तुम्हाला पडला असेल. तेथे रेल्वेसारखा मार्ग तर वापरता येणार नाही. मग काय करत असतील? विमानात एक विशिष्ट अशी व्यवस्था असते तेथील संडासातून मैला एका टाकीत नेला जातो. या टाकीत फॉर्माल्डीहाईड, क्वार्टर्नरी अमोनियम संयुग, रंगद्रव्य तसेच दुर्गंधीनाशक पदार्थ असतात. त्यामुळे मैला निर्जंतुक होतो व दुर्गंधीही येत नाही. विमान जमिनीवर आल्यानंतर या टाकीतील मैल्याची विल्हेवाट लावतात. विमानातील ही व्यवस्था आरोग्याच्या दृष्टीनेही चांगली असते. विष्ठेचा पाणी वा अन्नाशी संपर्क येऊ शकत नसल्याने रोगांचा प्रसार होत नाही.

### एकी

एक दोन तोंडाचा पक्षी, एका तळ्यात राहत होता... एकदा त्याला एक रामफळासारखे गोड फळ खायला मिळाले. तो फळ त्या पक्ष्याच्या एका तोंडाला खायला मिळाला तर... पक्ष्याच्या दुसऱ्या तोंडाला त्याचा खूपच हेवा वाटला... आणि त्याने पहिल्या तोंडाला अर्ध्या फळाची मागणी केली...

त्यावर पहिला तोंड त्याला म्हणाला... अरे... या फळाला तू खाल्लेस काय.... आणि मी खाल्ले काय... शेवटी आपला पोट तर एकच आहे...! तेव्हा हे अर्धे फळ... मी आपल्या बायकोला देतो.

त्या पहिल्या तोंडचे हे असे बोलणे ऐकून दुसऱ्या तोंडाला खूपच वाईट वाटले...! आणि त्या दिवसापासून तो तोंड निराशही राहायला लागला...

असाच एक दिवस, एक खूपच विषारी फळ दुसऱ्या तोंडाला मिळाले. ते बघितल्यावर पहिल्या तोंडाने ते नाही खाण्याचा सल्ला दिला... परंतु.... मागील वेळच्या रागामुळे दुसऱ्या तोंडाने त्याचा सल्ला ऐकलाच नाही.... आणि त्याने ते फळ खाल्ले... शेवटी जे व्हायचे तेच झाले. तो दोन तोंडी पक्ष्याचा मृत्यू झालाच.

**तात्पर्य :** एकीने राहण्यातच गोडी असते...! त्यात विरोध.... भांडण मुळीच होऊ देऊ नये.

## जीवन का अमृत (भाग १)



### बसंत ऋतु

इस शब्द में सहजोबाई जी हमें एक तुलनात्मक अध्ययन दे रही हैं। वे हमें बता रही हैं कि एक सतगुरु का हमारे जीवन में होना कितना ज़रूरी है और अपनी सारी जिंदगी का अनुभव हमें बता रही हैं। इस शब्द में उन्होंने गुरु की महिमा का वर्णन किया है; एक नए और अनोखे ढंग से और बड़े खूबसूरत अंदाज़ से उन्होंने गुरु और परमात्मा की तुलना करने की कोशिश की है। वे राजस्थान की रहनेवाली थीं। उस समय वहाँ के रहनेवाले एक प्रकार का गीत गाया करते थे, जिसे 'गाली' कहा जाता था। 'गाली' के नाम से उनका संगीत लोकप्रिय था। उसी भाव और लय में यह शब्द सहजोबाईजी ने गाया है। इस शब्द में वे हमें यही समझा रही हैं कि एक ज़िन्दा सतगुरु का हमारे जीवन में आना कितना महत्त्व रखता है। संत कृपालसिंह जी बार-बार फ़रमाया करते थे : ' Living Master is the greatest blessing on earth,' जब हम किसी सतगुरु की शरण में जाते हैं, वही हमारे लिए इस दुनिया में सबसे बड़ी देन है और वही सबसे बड़ा दिन भी है। हम उसे सतगुरु, महापुरुष, Living Master या मुर्शिदे-कामिल के नाम से पुकार सकते हैं। किसी महापुरुष की शरण में पहुँचना बहुत बड़ी बरक़त है।

सभी महापुरुषों, जैसे कबीर साहिब, गुरु साहिबान और दूसरे संतों के साथ साथ इस शब्द में सहजोबाई जी ने हमें गुरु का महत्त्व बताया है।

इस शब्द में पहली दो पंक्तियों में ही सहजोबाई जी ने रूहानियत का निचोड़ हमारे सामने पेश कर दिया है। यहाँ वे फरमा रही हैं :

**हरि किरपा जो होय तो, नाहीं होय तो नाहिं। पै**
**गुर किरपा दया बिनु, सकल बुद्धि बहि जाहिं।।**

इस शब्द में सहजोबाई जी हमें एक तुलनात्मक अध्ययन दे रही हैं। वे हमें बता रही हैं कि एक सतगुरु का हमारे जीवन में होना कितना ज़रूरी है और अपनी सारी जिंदगी का अनुभव हमें बता रही हैं। इस शब्द में उन्होंने गुरु की महिमा का वर्णन किया है; एक नए और अनोखे ढंग से और बड़े खूबसूरत अंदाज़ से उन्होंने गुरु और परमात्मा की तुलना करने की कोशिश की है। वे राजस्थान की रहने वाली थीं। उस समय वहाँ के रहने वाले एक प्रकार का गीत गाया करते थे, जिसे 'गाली' कहा जाता था। 'गाली' के नाम से उनका संगीत लोकप्रिय था। उसी भाव और लय में यह शब्द सहजोबाई जी ने गाया है। इस शब्द में वे हमें यही समझा रही हैं कि एक ज़िन्दा सतगुरु का हमारे जीवन में आना कितना महत्त्व रखता है। संत कृपालसिंह जी बार-बार फ़रमाया करते थे : ' Living Master is the greatest blessing on earth,' जब हम किसी सतगुरु की शरण में जाते हैं, वही हमारे लिए इस दुनिया में सबसे बड़ी देन है और वही सबसे बड़ा दिन भी है।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

उस घर-वापसी के लिए तैयार होने के लिए हमें अपने आपको ईश्वर के प्रेम में डुबो देना होगा और इस संसार से विरक्त होना होगा। इस समझ-बूझ और घर के बारे में जानकारी ने मेरे जीवन को सहारा दिया है। इससे मुझे बहुत लाभ हुआ है। जब तक हमें नाटक के बारे में जानकारी नहीं हो जाती, हम पूर्णतया आत्मचैतन्य नहीं हो सकते। हमें जब यह ज्ञान हो जाता है कि यह संसार बदलना है और यह भी कि प्रत्येक आत्मा के घर लौट जाने का समय आ पहुँचा है, इस ज्ञान से हमारे प्रयासों को स्मरण में बने रहने तथा दुर्गुणों की दासता से मुक्त होने की शक्ति प्राप्त होती है। फिर हम खुशी बाँटनेवाले बन जाते हैं।

ईश्वर के साथ, अंतर्मुखी बने रहकर मैंने अपने अंदर एकाग्रता की शक्ति का विकास किया, जिसने मुझे इस पुरातन एवं दकियानूसी संसार में बड़ी शांति और सुख से रहने योग्य बनाया। मुझे हमेशा यही लगता रहा है कि ईश्वर ही मेरा संसार है और मुझे कुछ भी नहीं करना पड़ा है, सिवाय इसके कि मैं इस भावना के साथ जीती रही हूँ कि मेरा नाता केवल उस एक परमपिता से है, किसी अन्य से नहीं, और शेष सभी मेरे बंधु-बांधव हैं। इस प्रकार की मानसिकता ने मुझे सभी सांसारिक प्रभाव या प्रलोभनों से दूर बने रहने का सामर्थ्य दिया है।

मैं मन-ही-मन सोचती हूँ कि हालात न तो अच्छे हैं, न बुरे हैं और यह भी कि अपनी उस प्रकृति को पकड़े रहना आवश्यक है, जो आपको समस्याओं और घटनाओं में फिसलने न दें। संसार में रहते हुए मुझे इस बात का ज्ञान रहता है कि इसने शक्ति और सचाई खो दी है तथा अब यह समाप्त होने के कगार पर है। मेरा कार्य नए संसार के लिए स्वयं को तैयार करना है।

तरीका बस यही है कि पिता का स्मरण करो, मैं चाहे जो भी हूँ और जैसी भी रही हूँ, मैं उसकी हूँ। फिर मैं देह के परे होने की चेतना में स्थिर रह सकती हूँ और सृष्टिकर्ता की शांति एवं शक्ति मेरे चेहरे पर एवं मेरे कर्मों तथा संबंधों में आ जाती है, जो हर उस व्यक्ति को आगे बढ़ने की प्रेरणा देती है, जिससे मैं भेंट करती हूँ। मेरे पास हर व्यक्ति के देने के लिए आध्यात्मिक प्रेम है।

आप भी इस सूक्ष्म, ईश्वरीय प्रेम की गहराइयों में जा सकते हैं और आपके माध्यम से दूसरों को आध्यात्मिक प्रेम का अनुभव होगा।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**बंड्या :** पप्पा विजेच्या तारा एवढ्या वर का असतात.
**वडील :** कारण, बायकांनी तारांवर कपडे वाळत घालू नये म्हणून.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✽ कोणी आपल्या वेबसाईटवर भारतीय फुटबॉल संघाचा कर्णधार सुनील छेत्री वर ३ एपिसोडची सिरीज प्रसिद्ध केली? - फिफा

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# काय खावे?

## मिरे

गरम मसाल्यातील उष्ण तिखट चवीचे मिरे सर्वांनाच परिचित आहे. खडा मसाला म्हणून अनेक गृहिणी स्वयंपाकघरात कल्पकतेने त्याचा उपयोग पदार्थ बनविण्यासाठी करतात. मराठीत 'मिरे', हिंदीमध्ये 'काली मिर्च', संस्कृतमध्ये 'मरिच', इंग्रजीमध्ये 'ब्लॅक पेपर', तर शास्त्रीय भाषेमध्ये 'पायपर नायग्रम' या नावाने ओळखले जाणारे मिरे 'पायपरेसी' कुळातील आहे. याचा स्वाद तिखट असल्याने गुजरातमध्ये याला 'तिरवा' असेही म्हणतात.

जगातील सर्वात जुने आणि महत्त्वाचे मसाल्याचे पीक म्हणून मिरे ओळखले जातात. याचे काळी मिरी आणि पांढरी मिरी असे दोन प्रकार आहेत. याचे उत्पादन मुख्यतः दक्षिण भारतात कर्नाटक व केरळातील जंगलांमध्ये होते. सहसा सुपारीच्या झाडांवर मिऱ्याचे वेल चढविले जातात. याची पाने नागवेलीच्या पानांसारखीच असतात. या मिऱ्यांच्या वेलाला फळाच्या मंजिऱ्या येतात. या मंजिऱ्यांनाच मिरे असे म्हणतात. मिऱ्याच्या वेलाला ज्या शेंगा येतात त्यांना 'गजपीपळ' असे म्हणतात, तर मुळांना चवक असे म्हणतात. काळी मिरी लोणची, पापड व तिखट खाद्यपदार्थ बनविण्यासाठी वापरतात. तर पांढरी मिरी कमी तिखट आणि अधिक स्वादयुक्त असते. अनेक ठिकाणी तसेच युरोप, मलबार येथे हिरवी मिरी खाणे पसंत केले जाते. हिरव्या मिरीपासून लोणचे बनविले जाते.

**औषधी गुणधर्म :**

**आयुर्वेदानुसार :** मिऱ्यांना युक्त्या चैव रसायनम् असे म्हटले आहे. म्हणजेच मिऱ्याचा आहारामध्ये व औषधांमध्ये योग्य वापर केल्यास रसायनासारखे कार्य करते. मिरे तिखट, तीक्ष्ण, अग्नी प्रदीप्त करणारे, पित्तकारक, रूक्ष, कृमीघ्न, कफ व वायनाशक आहेत.

**आधुनिक शास्त्रानुसार :** मिऱ्यामध्ये प्रथिने, कार्बोहायड्रेट्स, खनिजद्रव्ये व 'अ' जीवनसत्त्व इत्यादी घटक असतात.

उपयोग : १) गरम दुधात मिरेपूड, हळद, एक लवंग व साखर घालून प्यायल्याने सर्दी-खोकला बरा होतो.

२) पाव चमचा मिरेचूर्ण, एक चमचा मध व एक चमचा साखर एकत्र करून चाटल्याने जीर्ण (जुना) खोकला बरा होतो.

३) ज्यांना दम्याची उबळ वारंवार येते, त्यांनी अर्धा चमचा मिरेपूड मधाबरोबर चाटल्यास दम्याचा आवेग कमी होतो.

४) मिऱ्याचे रोज दोन-तीन दाणे सेवन केल्यास शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढून कोणताही आजार होत नाही.

५) रोजच्या आहारामध्ये मिऱ्याचा उपयोग करण्यासाठी मिरे कुटून वापरावेत. मिरेपूड करून ठेवली तर त्याचा स्वाद, गुणधर्म व गंध कमी होतो.

६) कोशिंबीर, आमटी, भाजी, लोणचे व पापडामध्ये मिऱ्याचा वापर करावा. यामुळे पदार्थांची चव वाढते.

७) मिरच्यांपेक्षा मिरे कमी दाहक व अधिक गुणकारी असल्याने अनेक लोक आहारामध्ये त्याचा वापर जास्त करतात. आरोग्य चांगले राखण्याच्या दृष्टिकोनातून मिरे वापरणे हितकारक आहे.

८) थंडीमुळे अंग गारठून आखडले असेल, तर मिरे पाण्यात बारीक वाटून त्याचा लेप अंगावर लावावा. यामुळे त्वचेमध्ये उष्णता निर्माण होऊन स्नायू व्यवस्थित कार्य करतात.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# अहिल्यानगरमधील संशोधक प्राध्यापकांनी दिले नवीन कीटक प्रजातीला 'वारली' चित्रकलेचे नाव

## अहमदनगर महाविद्यालयाच्या वतीने संशोधकांचा अध्यक्ष डॉ.आर.जे.बार्नबस यांच्या सत्कार


नगर – अहमदनगर महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागातील संशोधक प्राध्यापक डॉ. अविनाश वंजारे आणि प्रा. प्रशांत कटके तसेच कॅनडामधील शास्त्रज्ञ डॉ. समीर पाध्ये यांनी सह्याद्री मधून गोड्या पाण्यातील प्राण्याची (क्रस्टेशिया खेकडा, कोळंबी) एक नवीन प्रजाती शोधून काढली आहे. अहिल्यानगर जिल्हा तसेच अहमदनगर महाविद्यालयासाठी हे अतिशय अभिमानास्पद संशोधन आहे. पालघर जिल्ह्यामधील जव्हार पठारावर आढळणाऱ्या क्रस्टेशिया गटातील हि प्रजाती आहे. यास 'फेअरी श्रिम्प' असेही संबोधले जाते. पाण्यातील हे लहान जलचर प्राणी आहेत आणि ते फक्त पावसाच्या साचलेल्या लहान आकाराची तळी, डबके यांमध्ये विशिष्ट करून आढळतात.



अहमदनगर महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागातील संशोधक प्राध्यापक डॉ. अविनाश वंजारे आणि प्रा. प्रशांत कटके तसेच कॅनडामधील डॉ. समीर पाध्ये यांनी सह्याद्रीमधून गोड्या पाण्यातील प्राण्याची एक नवीन प्रजाती शोधून काढल्याबद्दल महाविद्यालयाच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.



स्ट्रेप्टोसेफलस वारली नर



डॉ. अविनाश वंजारे प्रा. प्रशांत कटक

या प्राण्यास खास करून ता. जव्हार, जिल्हा पालघर या भागात आढळल्याने त्यास वारनी असे नाव देण्यात आले आहे. स्ट्रेप्टोसेफलस वारली असे या प्राण्याचे नाव आहे. संशोधकांनी हे नाव देऊन या क्षेत्रात राहणाऱ्या जनजातींना (आणि त्यांच्या वारली कलेला) समर्पित केले आहे. वारली चित्रकला ही आदिवासी कलाचा एक प्रकार आहे जी प्रामुख्याने महाराष्ट्राच्या उत्तर सह्याद्री पर्वतरांगातील आदिवासी लोक करतात. अशा शोधांमुळे सह्याद्रीचा उतर पश्चिम घाटामधील अभ्यास न केलेल्या प्रजाती आणि त्यांच्या दुर्लक्षित अधिवासांचे संवर्धन करण्याची आवश्यकता अधोरेखित होते.

गेली १५ वर्षे अहमदनगर महाविद्यालयातील डॉ. अविनाश वंजारे हे गोड पाण्यातील सजीव तसेच कीटकांचा अभ्यास करत आहेत. अलीकडे पीएचडी करत असताना प्रा. प्रशांत कटके यांच्या सोबत ते संपूर्ण महाराष्ट्र भर अशा प्रकारच्या सजीवांचा अभ्यास करत आहेत. भारतामधून स्ट्रेप्टोसेफलस या प्राणिवर्गातील हि सातवी प्रजाती आहे तसेच या पूर्वी सह्याद्री पर्वतरांगेतून पाचगणी, जिल्हा सातारा मधून सध्या कॅनडास्थित शास्त्रज्ञ डॉ. समीर पाध्ये यांनी २०१४ साली सहावी प्रजाती शोधली होती त्यास त्यांनी स्ट्रेप्टोसेफलस सह्याद्रीएन्सिस असे नाव दिले होते. हे पाण्यातील प्राणी त्यांचे जीवन १५ ते ३० दिवस मध्ये पूर्ण करतात आणि फक्त पावसाळ्यात साचलेल्या पाण्यात तयार होतात. पाणी कमी झाले किंवा जीवनक्रम पूर्ण झाला कि ते अंडी घालतात. हि अंडी विशेष करून संपूर्ण उन्हाळ्यात किंवा जर पाऊस नाही पडला तर शेकडो वर्ष तसेच राहतात आणि पुन्हा पाण्याच्या संपर्काने ते उबवतात आणि नवीन प्राणी तयार होतात. अशा प्रकारे काही संशोधनांवरून अंदाजे लाखो वर्षांपासून त्यांचे वास्तव्य पृथ्वीवर आहे. महत्वाच्या अन्नसाखळी आणि त्यामध्ये असणार्या आकर्षक प्राण्यांचा अभ्यास बहुतांशी संशोधक करत असतात. परंतु हे लहान प्राणी आणि त्यासोबतच अशा तात्पुरत्या स्वरुपातील निर्माण होणार्या तलावातील प्राणी वर्ग हा अन्न म्हणून स्थानिक तसेच स्थलांतरित पक्षी व इतर प्राण्यांना अन्न म्हणून महत्वाचे ठरतात.

पारिस्थितीकीयदृष्ट्या पश्चिम घाट जैवविविधतेच्या दृष्टीने अतिशय समृद्ध आहे. अनेक जातींचे प्राणी, पक्षी व असंख्य प्रकारच्या वनस्पती येथे आढळतात. जगातील समृद्ध जैवविविधता असलेल्या प्रदेशात पश्चिम घाटाचा आठवा क्रमांक लागतो. वैज्ञानिक नॉर्मन मेअर्स यांच्या प्रयत्नांमुळे १९८८ मध्ये पश्चिम घाट जैवविविधता असलेला अतिसंवेदनशील प्रदेश म्हणून घोषित करण्यात आला.

यामध्येच पावसाने तयार होणारी हि सजीव सृष्टी माळरान, पठार, डोंगराळ भागात तयार होतात आणि अप्रत्यक्षपणे संपूर्ण अन्नसाखळी मध्ये महत्त्वाचे कार्य करतात. संपूर्ण महाराष्ट्र भर संशोधन करत असताना संशोधकांना मानवी हस्तक्षेपाने झालेला जमीन, डोंगर, त्यावरील जंगलांचा आणि या निसर्गाचा –हास आढळला. रस्ते तसेच इमारतींसाठी लागणारे दगड, मुरूम साठी डोंगर खोदले जात आहेत. या मध्ये निसर्गाची मोठ्या प्रमाणावर हानी होताना दिसते. जैव विविधतेतील बरेच प्राण्यांचे संशोधन न होताच रोज नष्ट होत आहेत. हा स्ट्रेप्टोसेफलस वारली फक्त एका लहान तलावात आढळला आहे म्हणजे तो संपूर्ण पृथ्वीवर फक्त एका तलावामध्ये सध्या त्याचे अस्तित्व आहे. तेथील भागही खनन कामामध्ये नष्ट झाला तर हे असे प्राणी संपुष्टात येईल हि खंत संशोधकांनी व्यक्त केली आहे.

जैवविविधतेच्या दृष्टीने पश्चिम घाट एक महत्त्वाचा असून अद्याप अपुरा शोधला गेला आहे, पश्चिम घाटसारख्या भागात संभाव्यतः अनेक नवीन प्रजाती असण्याची उच्च शक्यता आहे. संविधानांमधील मूलभूत कर्तव्यामधील सातवे कर्तव्य जंगले, तलाव, नद्या आणि वन्यजीवांसह नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण आणि सुधारणा करणे आणि सजीव प्राण्यांबद्दल करुणा बाळगणे हे आहे याची जाणीव होताना दिसते असे संशोधकांनी सांगितले.

स्ट्रेप्टोसेफलस वारली हया नवीन प्रजातींबद्दलची अतिरिक्त माहिती 'झूसिस्टेमॅटिक्स ॲण्ड इव्होल्यूशन' नावाच्या आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त युरोपियन जर्नलमध्ये सादर केली आहे.

या संशोधन साठी बीपीएचईएस चे अध्यक्ष डॉ. आर जे. बार्नबस, प्राचार्य डॉ. नोएल पारगे, उपप्राचार्य तसेच प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. दिलीपकुमार भालसिंग, डॉ. सय्यद रझाक आणि जैवतंत्रज्ञान विभागातील डॉ. सनी रुपवते यांचे सहकार्य लाभले. तसेच महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ यांचे हि सहकार्य लाभले.

यशाबद्दल अहमदनगर महाविद्यालयाच्या वतीने डॉ. वंजारे आणि प्रा. कटके यांचा सत्कार करण्यात आला. जैवविविधतेच्या संवर्धनासाठी व निसर्गरक्षणाच्या महत्त्वाविषयी जनजागृतीसाठी हा शोध नवा मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास महाविद्यालयाच्या वतीने व्यक्त करण्यात आला.




सेंट विवेकानंद स्कूलला जिल्हास्तरीय इंग्लिश वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

# जिल्हास्तरीय इंग्लिश वक्तृत्व स्पर्धेत सेंट विवेकानंद स्कूलला प्रथम क्रमांक

नगर – सेंट झेवियर्स स्कूल, श्रीरामपूर येथे २४ जुलै रोजी २० व्या जिल्हास्तरीय इंग्लिश वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात अहिल्यानगर येथील सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या कु. अमोघ समीर पळसकर आणि कु. अपूर्वा सागर नांदुरकर या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. फिरता चषक, प्रमाणपत्र, पाच हजार रुपये रोख रक्कम असे या पारितोषिकाचे स्वरूप आहे. या स्पर्धेत एकूण २१ शाळेतील ४२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

अमोघ पळसकर या विद्यार्थ्याला उत्कृष्ट वक्ता म्हणून मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि पाचशे रुपये रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. या विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या इंग्लिश विभाग प्रमुख शिरीन शेख, विषय शिक्षक मनिष आहुजा, गीता दुमाटे, आशा रंगलानी, दिव्या पोखरणा, समिना पटेल यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यालयाच्या प्राचार्या गीता तांबे मुख्याध्यापिका कंचन पापडेजा यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रुपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोदर माखिजा, विश्वस्त सुरेश हिरानंदानी, महेश मध्यान, राजकुमार गुरनानी, हरेश मध्यान यांनी सत्कार करून गुणगौरव केला.



के. जी.कला व वाणिज्य महाविद्यालयात कारगिल विजय दिन साजरा करण्यात आला.

# के. जी. महाविद्यालयात कारगिल विजय दिन साजरा

नगर – के. जी.कला व वाणिज्य महाविद्यालयात कारगिल विजय दिन साजरा करण्यात आला.

या प्रसंगी महाविद्यालयाच्या परिसर संचालिका प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांनी कारगिलच्या युद्धात आपले सैनिक हजारो फूट उंच पर्वतरांगांवर ऑक्सिजनच्या कमतरतेमध्ये शत्रूच्या गोळ्यांचा सामना करत देशाच्या रक्षणासाठी लढले. या सैनिकांचे ऋण आपण कधीही फेडू शकत नाही. असे विचार व्यक्त करून त्यांनी त्यांच्या शौर्याचा, त्यागाचा आणि पराक्रमाचा गौरव केला. कारगिल युद्धात शहीद झालेल्या सैनिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना वृद्धिंगत व्हावी यासाठी कारगिल विजय दिनाच्या निमित्ताने वक्तृत्व स्पर्धा व देशभक्तीपर गायन स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यक्रमाची भूमिका प्रा. सविता चव्हाण यांनी स्पष्ट केली. याप्रसंगी प्रा. डॉ. वर्षा कीर्तने, प्रा. स्नेहल बोरावके, प्रा. आरती खेडकर, सौ. हर्षाली रासकर व विद्यार्थी हजर होते.

# अवतार मेहेरबाबा केंद्रात ३० जुलै रोजी 'मीरा' हिंदी चित्रपटाचे विशेष प्रदर्शन

नगर – ए.एम.बी. ट्रस्ट कंपाऊंड, मेहेर नजर, फोर्स मोटर्स, जुन्या सरोश चित्रपटगृहाजवळील अवतार मेहेर बाबा अहमदनगर केंद्रात मेहेर बाबा मूव्हीज – 'मीरा' या हिंदी चित्रपटाचे ३० जुलै रोजी सायंकाळी ७ ते ९ या वेळेत विशेष प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रवेश सर्वांसाठी खुला आहे.

चित्रपटाचे दिग्दर्शन अमेरिकन चित्रपटकार एलिस डंगन यांनी केले असून, त्यांनी द्वारका, वृंदावन व राजस्थानातील वास्तव ठिकाणी चित्रीकरण केले. स्थानिकांमध्ये स्वीकृती मिळवण्यासाठी त्यांना भेसळ करून फिरावे लागले, अशी आख्यायिका आहे. 'मीरा' (१९४७) – एम.एस. सुब्बलक्ष्मी यांची प्रमुख भूमिका आहे.

# 'विचारवंतांच्या मुलाखती' या ग्रंथाचे ३१ जुलै रोजी प्रकाशन

नगर – लेखक, कवी, जीवन मार्ग साप्ताहिकाच्या संपादक मंडळाचे सदस्य व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या सांस्कृतिक कमिटीचे सदस्य कॉम्रेड सुभाष थोरात यांनी पुरोगामी चळवळीतील निवडक विचारवंतांच्या मुलाखती घेतल्या होत्या. त्या संपादित करून'विचारवंतांच्या मुलाखती' हा ग्रंथ वाचकांच्या भेटीसाठी येत आहे. या ग्रंथाचे प्रकाशन ३१ जुलै रोजी संध्याकाळी ५ वा. सर्जेपुरा, नगर येथील रहेमत सुलतान हॉल येथे होणार आहे, अशी माहिती सोनाली देवढे – शिंदे यांनी दिली.




सुभाष थोरात यांचे महिनाभरापूर्वी दीर्घ आजाराने निधन झाले. निधनानंतर हे पुस्तक हाती आल्याने त्यांच्या पश्चात या ग्रंथाचे प्रकाशन करण्याची जबाबदारी त्यांच्या समविचारी मित्र परिवाराने घेतली आहे. या प्रकाशन सोहळ्याचे अध्यक्षपद साहित्यिक प्रा. डॉ. प्रतिभा अहिरे या भूषविणार असून या कार्यक्रम प्रसंगी पुणे येथील किरणताई मोघे आणि लोकसांस्कृतिक मंचचे कॉम्रेड सुबोध मोरे उपस्थित राहणार आहेत. प्रा. डॉ. सुधाकर शेलार आणि प्राचार्य डॉ. शिरीष लांडगे हे समीक्षणपर भाष्य करणार आहेत.

या पुस्तकाचे संपादन डॉ. श्रीधर पवार आणि राजीव देशपांडे यांनी केले असून तेही या कार्यक्रमासाठी येणार आहेत. सदर पुस्तक मुंबईस्थित ललित प्रकाशनने प्रकाशित केले आहे.

'विचारवंताच्या मुलाखती' या ग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्याला शहरातील सर्व पुरोगामी विचारांचे कार्यकर्ते, युवक, तरुण, महिला आदींनी उपस्थित राहण्याचे आवाहन मराठा सेवा संघाचे महानगर प्रमुख इंजि. अभिजीत एकनाथ वाघ यांनी केले आहे. या कार्यक्रमासाठी भारतीय जनसंसदचे अशोक सब्बन, संध्याताई मेढे, युनूसभाई तांबटकर, ॲड. विद्या जाधव–शिंदे आदि परिश्रम घेत आहेत.

# 'रोटरी' केवळ एक संघटना नसून समाजाला दिशा देणारी चळवळ

### क्षितिज झावरे यांचे प्रतिपादन; अहमदनगरचा पदग्रहण सोहळा उत्साहात

नगर – रोटरी ही संस्था केवळ एक संघटना नसून समाजाला दिशा देणारी चळवळ आहे. अहमदनगर रोटरी क्लबने आतापर्यंत राबवलेल्या प्रकल्पांमुळे गरजूंपर्यंत मदतीचा हात पोहोचला आहे. येणार्या काळातही नव्या उत्साहाने समाजोपयोगी उपक्रम हाती घेऊन रोटरीचे नाव उज्वल करावे, अशी अपेक्षा आहे, असे प्रतिपादन प्रांतपाल क्षितिज झावरे यांनी केले.

अहमदनगर रोटरी क्लबचा पदग्रहण सोहळा नुकताच पार पडला. या सोहळ्याला रोटरी इंटरनॅशनलचे २०२७–२८ चे प्रांतपाल रोटरियन क्षितिज झावरे व सहाय्यक प्रांतपाल रोटरियन मधुरा झावरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष सुभाष गर्जे व सचिव संदीप ठोंबे यांनी आपली पदे स्वीकारली. माजी प्रांतपाल प्रमोद पारीख, शिरीष रायते यांच्यासह महावीर मेहेर, निलेश वैकर, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. सुधा कांकरिया, पुरुषोत्तम जाधव, दादासाहेब करंजुले, सर्जेराव निमसे, गुलशन गुप्ता, नितीन थाडे, सुरेश कांकरिया, दिलीप कर्णावट, सुनिता कर्णावट, प्रशांत बोगावत, कौशिक कोठारी, रवींद्र राऊत, अनघा राऊत, माधवराव देशमुख, साधना देशमुख, हर्षवर्धन सोनवणे, प्रीती सोनवणे, दीपक गुजराती, राजीव गुप्ता, राजेंद्र उपाध्याय, सुहास क्षीरसागर आदी उपस्थित होते.




अहमदनगर रोटरी क्लबचा पदग्रहण नुतन अध्यक्ष सुभाष गर्जे यांनी चार्टरचा स्विकार केला. याप्रसंगी ०२७–२८ चे प्रांतपाल रोटरियन क्षितिज झावरे व सहाय्यक प्रांतपाल रोटरियन मधुरा झावरे, सचिव संदीप ठोंबे, माजी अध्यक्ष नितीन थाडे आदी.

प्रांतपाल झावरे पुढे म्हणाले, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संवर्धन, महिला सक्षमीकरण आणि युवकांच्या कौशल्यविकासासाठी रोटरीने ठोस योजना राबवायला हव्यात. सामाजिक बदल घडवण्यासाठी सेवा कार्यात सातत्य हाच आपला मंत्र असावा. अहमदनगर क्लबचे कार्य हे प्रांतातील इतर क्लबांसाठी आदर्श ठरेल, असा मला विश्वास आहे.

यावेळी सुभाष गर्जे यांनी सांगितले, रोटरीची परंपरा म्हणजे निःस्वार्थ सेवा. या क्लबच्या अध्यक्षपदावर निवड होणे ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहोचून त्यांना सहाय्य करण्यासाठी आम्ही नवीन प्रकल्प आखणार आहोत. सदस्यांच्या एकजुटीने रोटरी क्लब अहमदनगरला नवीन उंचीवर नेण्याचा माझा संकल्प आहे. लवकरच शहर व ग्रामीण भागात आरोग्य शिबिरे, शिक्षणविषयक कार्यक्रम आणि वृक्षारोपण मोहीमा राबवू. रोटरी क्लबच्या सेवाभावातून शहराच्या विकासात मोलाचे योगदान देऊ, असा माझा विश्वास आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी गणेश वंदना अनन्या वैकर हिने सादर केले. तसेच प्रमुख पाहुण्याच्या हस्ते तुळसीच्या रोपास पाणी देवुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. पदग्रहण सोहळ्यात नूतन पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाची सूत्रे स्वीकारून समाजसेवेची ग्वाही दिली. सूत्रसंचालन दादासाहेब करंजुले व सौ.भावना वैकर यांनी केले. सेक्रेटरी संदीप ठोंबे यांनी आभार मानले.





महेश नागरी सहकारी पतसंस्था भिंगार आयोजित मोफत नेत्र तपासणी शिबीराचे उदघाटन करताना संस्थेचे संस्थापक नंदकुमार झंवर (मन्नूशेठ), चेअरमन डॉ. अशोक चंगेडे, व्हा. चेअरमन शांतीलाल मुनोत, संचालक संजय सपकाळ, नितीन शिंगवी, कांतीलाल बोरा, संचालिका सौ. वैशाली बोरा, सौ. अंजली शिंगवी, व्यवस्थापक राजेंद्र मेहेर आदी.

# महेश नागरी पतसंस्था आयोजित शिबिरात नेत्र तपासणी करून रुग्णांना चष्म्यांचे वाटप

नगर – महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्या, भिंगार, अहिल्यानगर व आनंदऋषीजी नेत्रालय तर्फे २७ जुलै रोजी मोफत नेत्र तपासणी व अल्पदरात मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये भिंगार व जवळील परिसरातील १२० रुग्णांनी सहभाग नोंदवुन आपली नेत्र तपासणी करुन घेतली.

आनंदऋषीजी नेत्रालयाच्या वतीने वाघमारे ओमकार, अमोल आडे, वीर भागवत यांनी वेगवेगळ्या तपासण्या केल्या. रुग्णांना अल्पदरात नंबरचे चष्मे उपलब्ध करुन देण्यात आले. रुग्णांना मोतीबिंदु शस्त्रक्रिया अल्पदरात करुन देण्यात येईल असे आनंदऋषीजी नेत्रालयाच्या वतीने किरण कवडे यांनी सांगितले.

शिबीर उद्घाटन प्रसंगी पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन नंदकुमार झंवर (मन्नुशेठ) यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले. पतसंस्थेचे चेअरमन डॉ. अशोक चंगेडे, व्हा.चेअरमन शांतीलाल मुनोत, संचालक संजय सपकाळ, कांतीलाल बोरा, नितीन शिंगवी, मारुती पवार, सुदाम गांधले, डॉ. श्रीकांत गांधी, संचालिका सौ. वैशाली बोरा, सौ. अंजली शिंगवी व इतर सर्व संचालक व्यवस्थापक राजेंद्र मेहेर व संस्थेचे कर्मचारी अधिकारी हजर होते.

उद्घाटन प्रसंगी संस्थेचे संस्थापक चेअरमन नंदकुमार झंवर यांनी सामाजिक कार्याबद्दल प्रशंसा केली. पतसंस्थेचे चेअरमन डॉ. अशोक चंगेडे यांनी सांगितले पतसंस्था दरवर्षी समाजउपयोगी उपक्रम राबवत असते. पुढे लवकरच महेश चिल्ड्रन पार्कचे नुतनीकरण करण्यात येईल.

संचालक संजय सपकाळ यांनी शिबीराची प्रस्तावना केली. नितीन शिंगवी यांनी आभार प्रदर्शन केले. ओमकार वाघमारे यांनी आनंदऋषीजी नेत्रालय बद्दल माहीती दिली व १ लाख शस्त्रक्रियेचा टप्पा पुर्ण केला असे सांगितले.

शिबीरास जालिंदर बोरुडे समाज सेवक यांनी मार्गदर्शन व सहकार्य केले.

# लंगोटी यार– १९७४ बॅचचा स्नेहमेळावा

नगर – दादा चौधरी विद्यालय क्र. २. भगवान श्री जिव्हेश्वर मार्ग, बागडपट्टी येथील जुन्या शाळेच्या पटांगणात वयाच्या संध्याकाळी बालपणाची पहाट भेटली, पुन्हा मैत्रीची वाट भेटली.

१९७४ बॅचचे 'लंगोटी यार' जवळपास पाच दशकांनंतर तारकपूर येथील हॉटेलमध्ये पुन्हा एकत्र आले, आणि जुन्या शालेय आठवणींच्या गंधात हरवले. हा स्नेहमेळावा केवळ कार्यक्रम नव्हता, तो एक आठवणींचा जिवंत गोफ होता. प्रत्येक मित्र गळाभेट घेत होता, डोळ्यांतून आठवणी चमकत होत्या आणि मनात तीच निरागसता उमटत होती. शालेय गणवेष नसला तरी मन मात्र तेच होतं, मित्रांमध्ये गळाभेटीच्या गंधात बालपण परत होतं.



लंगोटी यार– १९७४ बॅचच्या स्नेहमेळाव्यामध्ये एकत्र आलेले माजी विद्यार्थी.

कार्यक्रमाची सुरुवात दिवंगत मित्र महाजन चंद्रकांत, रच्चा सिद्धेश्वर, मोहन पाठखेडकर, राजेंद्र गोसके, सतीश पेद्राम व ज्ञात अज्ञात हयात नसलेले आमचे मित्र यांना श्रद्धांजली अर्पण करून झाली. ह.भ.प. कराळे जगन्नाथ यांनी पसायदान सादर केले आणि वातावरण अधिक सात्विक झाले.

सूत्रसंचालनाची धुरा अरुण दळवी यांनी हाती घेतली. त्यानंतर हास्यकल्लोळ, कोपरखळ्या, गमती – जमती, आठवणींचा ओघ... जगाच्या वाटेवर पाऊल ठेवताना अनेक चेहरे भेटले, पण ज्यांनी आपली खोड्या माफ केल्या, तेच खरे यार खरे भेटले. चहा, पापड, आणि गप्पांचे फड रंगले. प्रत्येकाने आपल्या जीवनातील प्रवास, आलेले चढ–उतार, यशाच्या कथा अगदी मनापासून शेअर केल्या. कोणी शिक्षक झाला, कोणी शिपाई, कोणी झाला मोठा अधिकारी, कोणी लहान मोठे उद्योजक पण सगळ्यांना जपलेली होती तीच शाळेची वही जुनी सारी.

कार्यक्रमाचे नियोजन भरत पतंगे, किशोर पिठे, काळे अशोक आणि लगड प्रकाश यांनी केले.

यावेळी अरुण दळवी, दीपक आंबेकर, किशोर पिठे, भरत पतंगे, ढेकणे महादेव, काळे अशोक, खेतमाळस संभाजी, बारवकर दिलीप, सुरेश रोहिवाल, किशोर व्यापारी, अशोक गोसावी, मुळे डी. एस., झेंडे बाबुराव, करमाळे अण्णासाहेब, लगड प्रकाश, मध्यान चंद्रभान, कराळे जगन्नाथ, लखापती प्रभाकर, भळगट सतीश, रसाळ प्रकाश, शेख रफिक, वायकर शिवाजी, तोडमल दादासाहेब, लोढा अशोक, मेंघानी परमानंद, मंत्री विजयकुमार आदी उपस्थित होते.

जीवनात यश मिळालं, मान–सन्मान मिळाले, पण 'लंगोटी यार' हे नातं... सगळ्यांपेक्षा मोठं ठरले. स्नेहभोजनाचा आस्वाद घेत गप्पा रंगल्या. साडेचार वाजले तरी कोणालाच जाणवलं नाही! पुन्हा भेटीच्या आणाभाका घेत, मोबाईल क्रमांकांची देवाणघेवाण करत, प्रत्येकजण समाधानाने घरी परतला. आठवणींच्या गाठी बांधून मनात, पुन्हा भेटूया, हाच निर्धार हातात!

या बॅचचे काही मित्र राहिले असतील, तर कृपया लखापती प्रभाकर ९०२८९९६८६० यांच्याशी संपर्क साधावा. त्यांना ग्रुपमध्ये सामील करण्यास आम्हाला अत्यंत आनंद होईल, असे आवाहन करण्यात आले आहे.

# चविष्ट मसाला शेवया

झटपट रेसिपी



न्याहरीचा एक उत्तम पर्याय म्हणजे मसाला शेवया. हा झटपट तयार होणारा आरोग्यदायी पदार्थ आहे. हॉस्टेलमध्ये काही तरी वेगळं ट्राय करायचं असेल तर मसाला शेवया नक्की करून बघा.

**सामग्री :** एक कप भाजलेल्या शेवया, एक बारीक चिरलेला कांदा, बारीक चिरलेला टोमॅटो, एक चमचा आलं-लसूण पेस्ट, अर्धा कप उकडलेले मटार, एक बारीक चिरलेली सिमला मिरची, अर्धा चमचा जीरं, अर्धा चमचा लाल तिखट, प्रत्येकी अर्धा चमचा हळद आणि धनेपूड, एक चमचा गरम मसाला, लिंबाचा रस, एक कप पाणी, चिरलेली कोथिंबिर आणि मीठ

**कृती :** कढईत दोन ते तीन चमचे तेल गरम करा. त्यात जीरं घाला. मग कांदा परतून घ्या. यानंतर सिमला मिरची आणि मटार घालून परता. सोबत आलं-लसूण पेस्ट घाला. मग लाल तिखट, धनेपूड, हळद घालून परतून घ्या. मसाल्यातून तेल सुटलं की त्यात शेवया घाला. चवीनुसार मीठ घाला. पाणी घालून शिजवून घ्या. पाणी आटल्यावर गरम मसाला घाला. दोन मिनिटं शिजू द्या. गॅस बंद करा. शेवयांवर कोथिंबिर घाला. गरमागरम खा.

# जोश

## शेर की जुबानी

दिल के लिये हयात का,
पैगाम बन गई,
बेचैनियां सिमट के तेरा,
नाम बन गई।

दिल पर हम बेवजहा
इल्जाम लगाते हैं,
धोका तो अक्सर
धडकन दिया करती है।

ये दोस्ती भी
एक रिश्ता है,
जो निभा दे वो
फरिश्ता है।

# प्रवास डिलिव्हरी बॉयचा

अचिव्हर

समस्तीपूर हे बिहार राज्यातील एक प्रसिद्ध शहर आहे. एकेकाळी येथील एक मास्टर साहेब विद्यार्थ्यांना बीजगणिताचे तत्व शिकवत होते. बेरीजचा कम्युटेटिव्ह गुणधर्म समजावून सांगताना त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले, तुम्ही संख्यांचा क्रम बदलला तरी त्या संख्यांची बेरीज किंवा निकाल बदलणार नाही. उदाहरणार्थ, तीन अधिक चार आणि चार अधिक तीन यांचे उत्तर सारखेच आहे. त्याचप्रमाणे अनेक संख्यांच्या गटाचा क्रम बदलल्याने निकाल बदलत नाही. त्या विद्यार्थ्यांमध्ये एक मुलगा होता. तो हे सगळं ऐकून हसत होता. कारण त्याने इतर मुलांसमोर तो विषय आधीच वाचला होता. तो मुलगा दुसरा तिसरा कोणी नसून 'सीएबीटी लॉजिस्टिक्स'चे संस्थापक शैलेश कुमार होते.

'सीएबीटी लॉजिस्टिक्स' स्थापनेच्या प्रवासात तो अनेक वेळा पडला. परंतु त्याने परिस्थितीसमोर झुकण्यास नकार दिला. त्याच्या धाडसाचे फळ म्हणजे आज 'सीएबीटी लॉजिस्टिक्स' सुमारे १६० कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल करणारी कंपनी बनली आहे. गरीब वातावरणात वाढलेल्या शैलेश कुमारचा प्रवास त्याच्या संघर्ष, कुतूहल आणि दृढनिश्चयाचे प्रेरणादायी उदाहरण आहे. वारंवार अपयश येऊनही लॉजिस्टिक्स क्षेत्रातील दिग्गजांपैकी एक बनण्याची शैलेश कुमारची कहाणी महत्त्वाकांक्षी उद्योजकांसाठी प्रेरणादायी ठरते. शैलेश कुमारचा जन्म १९८६ मध्ये एका सामान्य कुटुंबात झाला. त्याचे वडील गणिताचे शिक्षक होते. त्यांचा पगार फक्त १४०० रुपये होता. शैलेश कुमारला तीन भावंडे होती आणि ते सर्व एका खोलीच्या छोट्या घरात राहत होते. शैलेशला बालपणातच समजले होते की गरिबीच्या या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी शिक्षण हा एकमेव मार्ग आहे. शिक्षण हाच त्याच्या जीवनाचा दर्जा सुधारण्याचा एकमेव मार्ग मानून तो आयुष्यात पुढे गेला.

सुरुवातीचे शिक्षण घेतल्यानंतर तो कोटा येथे गेला आणि आयआयटीची तयारी केली. परंतु अनेक प्रयत्नांनंतरही त्याला यश मिळाले नाही. निराश होऊन शैलेश घरी परतला आणि वडिलांच्या सल्ल्यानुसार त्याने पंजाब टेक्निकल युनिव्हर्सिटीमधून अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले आणि २०११ मध्ये तो अभियंता झाला. आता आव्हान होते चांगली नोकरी मिळवण्याचे. अनेक लहान-मोठ्या नोकऱ्या केल्यानंतर त्याला शेवटी डेलमध्ये ३२,००० रुपयांची नोकरी मिळाली. सर्वप्रथम त्याच्या कॅब ड्रायव्हरला ६०,००० रुपये कमावताना पाहून त्याने येथे स्वत:चा कॅब व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला. पहिले दोन व्यवसाय अयशस्वी झाले त्याने कर्ज घेऊन टोयोटा इनोव्हा कार खरेदी केली आणि यात्रा डॉट कॉममध्ये सामील झाला. व्यवसाय वाढवण्यासाठी त्याने कर्ज घेऊन अधिक वाहने खरेदी केली. सर्व काही व्यवस्थित चालले होते. नंतर डिझेल वाहनांवर बंदी आल्यामुळे त्याला हा व्यवसाय बंद करावा लागला. शैलेश थांबला नाही. त्याला एचसीएलमध्ये नोकरी मिळाली आणि तो तिथे मॅनेजर झाला. तथापि त्याला नोकरी आवडली नाही आणि त्याने ई-कॉमर्स स्टार्टअप सुरू केला. काही काळानंतर वस्तू विकल्या जात नसल्यामुळे त्याला तोटा होऊ लागला. म्हणून त्याला तोदेखील बंद करावा लागला.



पहिल्या दोन व्यवसायांच्या अपयशानंतर त्याने जवळजवळ सर्व बचत गमावली होती. आता त्याच्याकडे रोजगार नव्हता आणि उत्पन्नाचा दुसरा कोणताही स्रोत नव्हता. पैसे कमवण्यासाठी तो फ्लिपकार्टमध्ये डिलिव्हरी बॉय बनला. यासाठी त्याला १७,००० रुपये मानधन मिळत असे. या काळात त्याला लक्षात आले, की लॉजिस्टिक्सची संपूर्ण व्यवस्था गोंधळलेली आहे. यानंतर, त्याने भारताच्या अव्यवस्थित डिलिव्हरी इकोसिस्टमच्या समस्येवर मात करण्यासाठी 'सीएबीटी लॉजिस्टिक्स' सुरू करण्याचा विचार केला. २०१८ मध्ये त्याने शहरांतर्गत लॉजिस्टिक्स फर्म सीएबीटी लॉजिस्टिक्सची स्थापना करून स्वतःचा ब्रँड तयार केला.

## वेगळे काही

### बाळाला झोपवण्यासाठी 'एआय'



'ओपन एआय'चे 'सीईओ' आणि चॅटजीपीटी जगासमोर आणणारे सॅम ऑल्टमन आणि त्यांचे पार्टनर ऑलिव्हर मुल्हेरिन यांनी या वर्षाच्या सुरुवातीला पहिल्या बाळाचे स्वागत केले. बाळांच्या काळजीची शिफारस करताना ऑल्टमनने स्वतः सोशल मीडिया पोस्टमध्ये ही माहिती दिली. एक्स वर (पूर्वीचे ट्विटर) त्यांनी लिहिले, आम्हाला गरज नसलेल्या अनेक वस्तू आम्ही बाळासाठी खरेदी केल्या. परंतु मी निश्चितपणे 'क्रेडलवाइज स्विंग' आणि भरपूर बर्प रॅग्सची शिफारस करेन.'' ऑल्टमनच्या या छोट्या पोस्टमुळे जगभरात ' क्रेडलवाइज' नावाच्या स्मार्ट स्विंगची चर्चा पसरली. बेंगळुरूमधील स्टार्टअप ' क्रेडलवाइज' कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे बाळ जागे होण्याची सुरुवातीची चिन्हे ओळखते आणि हळूहळू त्याला पुन्हा झोपायला लावते. टेक्नो सॅव्ही पालकांमध्ये आधीच लोकप्रिय होत असलेल्या या तंत्रज्ञानाला आता 'एआय' उद्योगातील सर्वात विश्वासार्ह नावाकडून मान्यता मिळाली आहे आणि त्याचा मोठा परिणाम झाला आहे.

## डेटा सेफ्टी

### पासवर्ड सुरक्षित ठेवायचाय?

कोणीही आपला पासवर्ड हॅक करू नये आणि माहिती पूर्णपणे सुरक्षित राहावी, असे तुम्हाला वाटत असेल तर या गोष्टी नक्की फॉलो करा. पासवर्ड लांब आणि गुंतागुंतीचा ठेवा. कोणत्याही शब्दकोशात सापडणार नाही असा किमान १२ अक्षरांचा पासवर्ड ठेवा. मोठ्या आणि लहान अक्षरे, संख्या आणि विशेष चिन्हांचे मिश्रण आवश्यक आहे. नावे, जन्मतारीख किंवा सोपे शब्द टाळा. हॅकर्स प्रथम १२३४५६, पासवर्ड, इंडिया २०२४ सारखे पासवर्ड वापरून पाहतात. प्रत्येक खात्यासाठी वेगळा पासवर्ड ठेवा. सर्वत्र एकच पासवर्ड असेल आणि तो विसरला तर सर्वकाही धोक्यात येईल. वेगवेगळ्या खात्यांसाठी वेगवेगळे पासवर्ड तयार करणे आणि लक्षात ठेवणे कठीण वाटत असेल तर पासवर्ड मॅनेजरची मदत घ्या. हे टूल तुमच्यासाठी मजबूत पासवर्ड तयार करते आणि ते सुरक्षितपणे सेव्ह करते. तुम्हाला फक्त एक मास्टर पासवर्ड लक्षात ठेवावा लागेल.




# जपानमध्ये सर्वात फास्ट इंटरनेट

टेक टॉक

तुम्ही ॲप उघडण्यासाठी लागणाऱ्या वेळेत संपूर्ण नेटफ्लिक्स लायब्ररी डाउनलोड करू शकाल का? हा विनोद नाही, तर जपानमध्ये अलीकडेच उदयास आलेल्या इंटरनेट तंत्रज्ञानाचे खरे स्वरूप आहे. जून २०२५ मध्ये जपानच्या राष्ट्रीय माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान संस्थेने (एनआयसीटी) जगातील सर्वात वेगवान इंटरनेट गतीचा विक्रम मोडला. त्यांनी प्रति सेकंद १.०२ पेटाबाइट्स म्हणजेच प्रति सेकंद १ दशलक्ष गीगाबाइट्सपेक्षा जास्त वेगाने डेटा प्रसारित केला.



स्टीमवरील सर्व गेमची एकूण साईझ सुमारे १.२ पेटाबाइट्स आहे. या नवीन गतीसह तुम्ही तुमच्या सिस्टममध्ये बाल्डूरच्या गेट ३ पासून काउंटर-स्ट्राइक २ पर्यंतचे सर्व गेम्स काही सेकंदात डाउनलोड करू शकता. तुम्ही एकाच वेळी १ कोटी ८ के व्हिडिओ स्ट्रीम करू शकता. म्हणजेच न्यूयॉर्क आणि टोकियोच्या संपूर्ण लोकसंख्येने एकाच वेळी वेगवेगळे चित्रपट पाहिले तरी वेग कमी पडणार नाही. स्पॉटिफायच्या मते एका मिनिटाचे गाणे सुमारे १ एमबी असते. त्यानुसार तुम्ही एका सेकंदात ६७ दशलक्ष गाणी म्हणजेच सुमारे १,२७,५०० वर्षांचे संगीत डाउनलोड करू शकता. इंग्रजी विकिपीडिया सुमारे शंभर जीबी आहे.


# फॉलो द एटिकेट्स

फिटनेस फंडा

दोस्तांनो, तुम्ही जीमला जाता. जीममध्ये काही एटिकेट्स फॉलो करावे लागतात. हे नियम कुठेही लिहून ठेवलेले नसतात. पण आपणच काही गोष्टींची काळजी घ्यायला हवी. जीममध्ये कोणत्या गोष्टी टाळता येतील? जाणून घेऊ.

✽ आपण जीममधली उपकरणं वापरतो. डंबेल्ससारखी उपकरणं विशिष्ट ठिकाणी ठेवलेली असतात. त्यामुळे वापरानंतर ती जागच्या जागी ठेवायला हवीत. काहीजण डंबेल्स व्यायामाच्या ठिकाणीच ठेऊन जातात. मग जीममधल्या कर्मचाऱ्यांना ती नीट ठेवावी लागतात. त्याऐवजी आपणच ती जागेवर ठेवणं योग्य ठरतं.

✽ व्यायाम करून कितीही दमलात तरी हातातले डंबेल्स जोरात खाली टाकू नका. यामुळे डंबेल्स तुटू शकतात. इतरांचंही लक्ष विचलित होतं. त्यामुळे प्रत्येक उपकरण हळूवारपणे खाली ठेवा.



✽ जीममध्ये गेल्यावर स्मार्टफोन शक्यतो बाजूलाच ठेवावा. फोन जवळ असला तरी त्यावर मोठ्याने बोलू नये. जीममध्ये म्युझिक सुरू असतं. लोकांचा आवाजही येत असतो. त्यामुळे ऐकू आलं नाही तरी तुम्ही हळूच बोला.

✽ व्यायाम करताना इतरांशी गप्पा मारू नका. सगळं लक्ष व्यायामावर केंद्रित करा. मोठ्याने गप्पा मारल्याने इतरांना त्रास होऊ शकतो.

# ट्रेंडी ऑफिसवेअर

फॅशन पॅशन


दोस्तांनो, कामाच्या ठिकाणी स्टायलिश दिसण्यासोबतच आरामदायीही वाटायला हवं. त्यातच फॉर्मल्समध्ये आपलं व्यक्तिमत्त्वही उठून दिसायला हवं. यासाठी तुम्ही ट्राउझर्सचे काही लेटेस्ट ट्रेंड ट्राय करू शकता.



✽ ॲंटी फ्लेक्स ट्राउझर्समध्ये तुम्हाला आरामदायी वाटू शकतं. या ट्राउझर्सच्या कंबरेला स्ट्रेच होणारा बँड दिलेला असतो. यामुळे या पँट्स व्यवस्थित बसतात. यासोबतच पँटच्या खिशांना सेफ्टी झिपर्सही असतात.

✽ शार्प आणि स्लिक दिसण्यासाठी ड्रेस पँट्स ट्राय करा. या पँट्स तयार करण्यासाठी खास कापड वापरलं जातं. यामुळे त्यावर सुरकुत्या पडत नाहीत.

✽ सध्या लाईटवेट ट्राउझर्सही मिळतात. कमी वजनाच्या या ट्राउझर्समध्ये तुम्ही आरामात वावरू शकता. या ट्राउझर्स तयार करण्यासाठी आरामदायी फॅब्रिक्स वापरले जातात. या दिसतातही खूप छान.





# पावसाळी भ्रमंती

भटकंती

पावसाळा अतिशय आल्हाददायक असतो. या ऋतूत प्रत्येकाला छान थंड हवा, दऱ्या, डोंगरात जायला आवडते. तुम्हाला पावसाळ्याचा पुरेपूर आनंद घ्यायचा असेल तर भारतातील काही ठिकाणे तुमच्यासाठी परफेक्ट ठरू शकतात.

**कोडईकॅनॉल**

तामिळनाडूत वसलेले कोडईकॅनॉल पावसाळ्यात अक्षरश: स्वर्गासारखे रम्य दिसते. हे हिल स्टेशन समुद्रसपाटीपासून २१३३ मीटर उंचीवर आहे. याला 'हेल ऑफ क्वीन्स' असेही म्हणतात. पावसाळ्यात फिरण्यासाठी हे ठिकाण परफेक्ट आहे. येथे आपल्या जोडीदारासोबत रोमान्सचा एक क्षण घालवू शकता.

**अलेप्पी**

अलेप्पीला केरळचे व्हेनिस म्हणतात. पावसाळ्यात येथे फिरण्याचा बेत आखला, तर तुमचा प्रवास संस्मरणीय ठरेल. इथे तुम्हाला शांतता वाटेल.

**झिरो व्हॅली**

अरुणाचल प्रदेशातील झिरो व्हॅली समुद्रसपाटीपासून सुमारे ५,६०० फूट उंचीवर आहे. इथले सुंदर तलाव आणि धबधबे पाहून तुम्हाला इथे स्थायिक होण्याची इच्छा होईल. याशिवाय तवांगलाही जाऊ शकता.

**लोणावळ्याचा खास प्लॅन**

पावसाळ्यात फिरण्याची चर्चा होते तेव्हा महाराष्ट्रातील एक नाव नक्कीच घेतले जाते. पावसाळ्याची खरी मजा एन्जॉय करायची असेल तर महाराष्ट्रातील लोणावळ्याला नक्की जा.

**कुर्ग**

पावसाळ्यात कुर्गचे सौंदर्य पाहण्यासारखे असते. कर्नाटकातील कुर्ग पावसाळ्यात अधिकच आकर्षक बनते. इथली हिरवळ आणि हिरवेगार डोंगर प्रत्येकाच्या मनाला भुरळ घालतात.

# दिसणं महत्त्वाचं आहे?

मॅच मेकिंग

मी २७ वर्षांची मुलगी आहे. गेल्या काही दिवसांपासून माझ्यासाठी सुयोग्य जोडीदाराचा शोध सुरू आहे. मध्यंतरी माझ्यासाठी एक स्थळ आलं होतं. मुलगा आयुष्यात स्थिरस्थावर असून त्याचं कुटुंब खुल्या विचारांचं आहे. पण तो दिसायला सर्वसाधारण आहे. खरं सांगायचं तर थोडा स्थूल आहे. मला तो पसंत पडलेला नाही. मी गोंधळून गेले आहे. माणूस म्हणून तो खूप चांगला आहे. त्याची जीवनशैली माझ्यापेक्षा खूप वेगळी आहे. मला आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा मुलगा हवा आहे. आमची लाईफस्टाईल जुळत नसल्याने मी त्याला नकार द्यावा का बाकी सगळं चांगलं नसल्यामुळे याकडे दुर्लक्ष करावं? याबाबत मला मार्गदर्शन करा.



**उत्तर :** स्थूलपणा सोडल्यास त्याच्यात कोणतीही कमतरता नसेल तर तू याबाबत त्याच्याशी बोलू शकतेस. त्याला भेटून तुझं मत मांडायला काहीच हरकत नाही. आरोग्यदायी जीवनशैली, फिटनेस यांचं महत्त्व तू त्याला पटवून देऊ शकतेस. आजकाल एका स्थूलपणामुळे सामान्य माणसाला किती व्याधी जडू शकतात, याची माहिती घे. गरज वाटल्यास समुपदेशकांची मदत घेता येईल. त्यामुळे नकार देण्याचा निर्णय घाईघाईने घेऊ नकोस.

## जाणून घ्या

### पावसाळ्यात अशी घ्या काळजी

मुसळधार पाऊस पडत असेल तेव्हा लगेच फ्रीज आणि एसीचा प्लग काहीवेळासाठी सॉकेटमधून काढून टाका. पावसाळ्यात वारंवार वीज खंडित होते. शिवाय पावसाळ्यात व्होल्टेजमध्ये चढ-उतार होणेदेखील सामान्य आहे. अशा परिस्थितीत पावसाळ्यात सॉकेटमधून फ्रीज आणि एसीचा प्लग काढून टाकणे सुरक्षित असते. यामुळे तुमच्या इलेक्ट्रॉनिक वस्तू सुरक्षित राहण्यास मदत होईल. भिंतीवर ओलसरपणा असल्यास ही भीती असते. बरेचदा सततच्या पावसामुळे घरात ओल येते. तुमच्या घराच्या भिंतीवर एसी किंवा फ्रिज सॉकेट असेल तर त्या भिंतीवरील प्लग काढून टाका. ओल आल्यामुळे फ्रीज किंवा एसीच्या प्लगमध्ये पाणी गेले तर शॉर्ट सर्किट होण्याचा धोका असतो. अशा परिस्थितीत भिंतीवरील ओलसरपणा सुकेपर्यंत सॉकेटमधून प्लग बाहेर ठेवणे चांगले. फ्रीजजवळ दुसरा कोणताही सॉकेट नसेल तर भिंतीवरील ओल जाईपर्यंत तुम्ही एक्सटेंशन बोर्ड वापरू शकता. एसीचे आउटडोअर युनिट पावसाचे पाणी थेट पोहोचते अशा ठिकाणी बसवले असेल तर विशेष काळजी घ्या. पावसाळ्यात एसी वापरात नसताना आउटडोअर युनिट झाकणे चांगले. बाजारात एसीच्या आउटडोअर युनिटसाठी प्लास्टिक कव्हर्स उपलब्ध आहेत. यामुळे तुमच्या एसीच्या आउटडोअर युनिटचे पावसाच्या पाण्यापासून संरक्षण होईल. असे करणे शक्य नसेल तर पावसाळ्यात आणि पावसानंतर आउटडोअर युनिट पूर्णपणे सुकेपर्यंत एसी चालू करू नका. पावसाळ्याच्या दिवसात बाहेर बसवलेले ट्रान्सफॉर्मर वगैरे वस्तू ओल्या होतात आणि त्यामुळे विजेचा चढउतार वाढतो. अशा परिस्थितीत रेफ्रिजरेटर आणि एसीसोबत स्टॅबिलायझर वापरणे शहाणपणाचे आहे.



# क्षेत्र फोटो जर्नलिझमचं...

करियरवाट

दोस्तांनो, एक फोटो खूप काही सांगून जातो. फोटोतून आपण आपल्या भावना व्यक्त करू शकतो. एखादा फोटो लोकांच्या मनाला भिडतो. त्या फोटोतून एखाद्या ठिकाणच्या परिस्थितीचा अंदाज घेता येतो. तुम्हालाही फोटोतून व्यक्त व्हायचं असेल तर फोटो जर्नलिझमचा पर्याय उपलब्ध आहे. फोटो जर्नलिझम हे रंजक आणि धाडसी करिअर आहे. यात तुम्ही अंगभूत कौशल्यांचा वापर करू शकता. या क्षेत्रातल्या करिअरबाबतचं हे मार्गदर्शन...



✽ सध्या लाईटवेट ट्राउझर्सही मिळतात. कमी वजनाच्या या ट्राउझर्समध्ये तुम्ही आरामात वावरू शकता. या ट्राउझर्स तयार करण्यासाठी आरामदायी फॅब्रिक्स वापरले जातात. या दिसतातही खूप छान.

फोटोग्राफी शिकल्यानंतर तुम्ही एखादा वर्तमानपत्रात काम करू शकता. इथे तुम्हाला प्रशिक्षणही दिलं जातं. सुरुवातीला वरिष्ठ फोटोग्राफरच्या मार्गदर्शनाखाली काम करता येईल.

✽ या क्षेत्रात करिअर करण्याआधी स्वत:ची वेबसाईट तयार करा. या साईटवर तुम्ही फोटो पोस्ट करू शकता. तुमचे फोटो सोशल साईटवरही अपलोड करता येतील.

✽ वेबसाईट तयार केल्यानंतर सातत्याने फोटो अपलोड करत रहा. फोटो स्टोरी तयार करा. शब्दांशी खेळा. लेखनकौशल्यं वाढवा.

✽ या क्षेत्रात प्रचंड मेहनत करावी लागते. बाहेर फिरावं लागतं. त्यामुळे याची तयारी ठेवा.

# आयआयटी मुंबईचे दोन नवे अभ्यासक्रम

वेगळ्या वाटा

इं 'आयआयटी बॉम्बे'ने 'सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट' आणि 'सायबर सिक्युरिटी' हे दोन प्रोफेशनल सर्टिफिकेट प्रोग्राम सुरू केले आहेत.

हे प्रोग्राम ट्रस्ट लॅब, 'आयआयटी बॉम्बे' द्वारे ऑफर केले जात आहेत आणि विशेषतः कार्यरत व्यावसायिक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांसाठी डिझाइन केलेले आहेत. या प्रोग्राम्सचा फोकस उद्योगाच्या गरजा आणि व्यावहारिक कौशल्यांवर आहे. या दोन्ही प्रोग्राम्ससाठी नोंदणी २५ ऑगस्ट २०२५ पर्यंत केली जाईल.

**सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट कोर्स:**

हा प्रोग्राम केवळ थियरीवरच नाही तर वास्तविक जगातील कौशल्यांवरदेखील भर देतो. यासाठी दर आठवड्याला लॅब-आधारित प्रयोग केले जातील. या प्रोग्राममध्ये सहभागी होणाऱ्या लोकांना प्रथम UNIX, HTML, CSS आणि JavaScript सारख्या मूलभूत गोष्टी शिकवल्या जातील. त्यानंतर ते PHP, MERN (MongoDB, Express.js, React, Node.js) आणि React with Django वापरून फुल-स्टॅक डेव्हलपमेंट शिकतील. या कोर्समध्ये क्लाउड डिप्लॉयमेंटसाठी चाचणी पद्धती आणि CI/CD पाइपलाइन देखील समाविष्ट आहेत. भविष्यात, क्लाउड कॉम्प्युटिंग, सिस्टम प्रोग्रामिंग आणि सॉफ्टवेअर इंजिनिअरिंगसारखे विषयदेखील त्यात जोडले जातील. या प्रोग्राममध्ये व्यावसायिक प्रमाणपत्र मिळविण्यासाठी, दोन वर्षांत किमान तीन अभ्यासक्रम पूर्ण करावे लागतील. प्रत्येक कोर्सचे स्वतःचे पात्रता आणि मूल्यांकन नियम आहेत. यामध्ये निवड शैक्षणिक ट्रान्सक्रिप्ट, उद्देशाचे विधान (SOP) आणि शिफारसीवर आधारित असेल.




**सायबर सुरक्षा**

'रिअल वर्ल्ड क्रिप्टोग्राफी'चा अभ्यासक्रम १ सप्टेंबर २०२५ पासून सुरू होईल. त्यात एन्क्रिप्शन, डिजिटल सिग्नेचर, सुरक्षित की एक्सचेंज आणि बरेच काही शिकवले जाईल. नेटवर्क सुरक्षेचा अभ्यासक्रम २ जानेवारी २०२६ पासून सुरू होईल. त्याचे लक्ष प्रमुख इंटरनेट प्रोटोकॉल लेयर अटॅक आणि आधुनिक नेटवर्क संरक्षण धोरणांवर असेल. प्रत्येक अभ्यासक्रम १२-१४ आठवड्यांसाठी ऑनलाइन असेल. त्यात पूर्व-रेकॉर्ड केलेली व्याख्याने, टीए (शिक्षण सहाय्यक) द्वारे सहाय्यित प्रयोगशाळा आणि आठवड्याच्या शेवटी लाइव्ह ट्यूटोरियल समाविष्ट असतील. विद्यार्थी वर्गातदेखील उपस्थित राहू शकतात आणि इच्छित असल्यास कॅम्पस ॲक्टिव्हिटीजमध्ये सहभागी होऊ शकतात.

**पात्रता**

अभियांत्रिकी किंवा संगणक शास्त्रात ३ किंवा ४ वर्षांची पदवी असलेले उद्योग व्यावसायिक पदवीधर तृतीय किंवा चौथी वर्ष आणि पदव्युत्तर विद्यार्थी अर्ज करू शकतात. संबंधित विषयांचे प्राध्यापकदेखील अर्ज करू शकतात.

**फी किती आहे?**

कोअर सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट कोर्सची फी १९,००० ते ३६,००० रुपयांपर्यंत आहे, तर सायबर सिक्युरिटी मॉड्यूलची फी ३६,००० ते ७२,००० रुपयांपर्यंत आहे. प्रत्येक कोर्ससाठी विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे पैसे द्यावे लागतील आणि प्रत्येक कोर्स पूर्ण केल्यानंतर त्यांना प्रमाणपत्र मिळेल. दोन वर्षांच्या आत आवश्यक असलेले तिन्ही कोर्स पूर्ण केल्यावर व्यावसायिक प्रमाणपत्र दिले जाईल.

# दातांच्या सर्व उपचारांचा महात्मा फुले जनआरोग्य व मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये समाविष्ट करावा

### डेंटल सर्जन असोसिएशन ऑफ इंडियाची मागणी

नगर – दातांच्या सर्व उपचारांचा महात्मा फुले जनआरोग्य योजना व मुख्यमंत्री सहायता निधी मध्ये समाविष्ट करावा, अशी मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना डेंटल सर्जन असोसिएशन ऑफ इंडियाच्या वतीने करण्यात आली, असे दंततज्ञ डॉ. केतन गोरे यांनी सांगितले.

याप्रसंगी आमदार संग्राम जगताप, युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष केतन क्षीरसागर, सुमित कुलकर्णी, डेंटल सर्जन असोसिएशन ऑफ इंडियाचे महाराष्ट्र समन्वयक डॉ. सुदर्शन गोरे, दंततज्ञ डॉ. केतन गोरे आदी उपस्थित होते.

दात हा आपल्या शरीराचा महत्त्वाचा भाग असून पचनसंस्थेसाठी महत्त्वाचा अवयव आहे. निरोगी आरोग्य राखण्यासाठी दात महत्त्वाचे ठरतात. परंतु दातांचे उपचार जीवनावश्यक उपचारांमध्ये समाविष्ट नसल्यामुळे दात बसवणे, रूट कॅनल कॅप यासारखे अत्यावश्यक उपचार कोणत्याही विमा कंपनीच्या इन्शुरन्स मध्ये व कोणत्याही योजनेत समाविष्ट नाही, त्यामुळे सर्वसामान्य व गरीब गरजू रुग्ण या दातांच्या उपचारांपासून वंचित राहत आहेत असे दिसून येते.


दातांच्या सर्व उपचारांचा महात्मा फुले जनआरोग्य योजना व मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये समाविष्ट करावा, या मागणीचे निवेदन डेंटल सर्जन असोसिएशन ऑफ इंडियाच्या वतीने दंततज्ञ डॉ. केतन गोरे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिले.

तरी यावर उपाय म्हणून दातांचे सर्व उपचार हे महात्मा फुले जन आरोग्य योजनेमध्ये व मुख्यमंत्री सहायता निधीच्या मध्ये समाविष्ट करण्यात यावे ही विनंती सर्व डेंटल सर्जन मार्फत करण्यात येत आली. असे डॉक्टर केतन गोरे यांनी सांगितले.

याबाबत बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की मुंबईला गेल्यावर याविषयीची बैठक घेऊन दाताचे उपचार महात्मा फुले जन आरोग्य योजनेत व मुख्यमंत्री सहाय्यता निधी यामध्ये समाविष्ट करण्याबाबत निर्णय घेऊ असे अजित पवार म्हणाले.

# ऑनलाईन गेमिंगच्या माध्यमातून सुरू असलेल्या जुगारावर तत्काळ बंदी घाला अन्यथा हजारो कुटूंब उद्ध्वस्त होतील

नगर – सध्या महाराष्ट्र राज्यातील युवक, विद्यार्थी आणि बेरोजगार तरुण एक नवीन पण अत्यंत घातक संकटात अडकत आहेत. ऑनलाईन गेमिंगच्या नावाखाली चालणाऱ्या डिजिटल जुगारात! 'गेम खेळा आणि पैसे कमवा' अशा गोंडस जाहिरातींच्या माध्यमातून मोठमोठे सेलिब्रेटी, अभिनेते आणि सोशल मीडिया शेकडो कुटुंबं इन्फ्लुएन्सर्स या गेमिंग ॲप्सचं प्रमोशन करत आहेत. यामागे एक भयंकर वास्तव आहे. अनेक कुटुंबे उध्वस्त झाली आहेत, कर्जबाजारी झाली आहेत, काही तर आत्महत्येच्या उंबरठ्यावर आले आहेत.


महाराष्ट्रात ऑनलाईन गेमिंगच्या माध्यमातून सुरू असलेल्या जुगाराच्या महाभयानक विळख्यावर तत्काळ बंदी घाला अशा मागणीचे निवेदन उपमुख्यमंत्री अजित पवार यांना देताना सागर गुंजाळ आदी.

हे ॲप्स केवळ गेमिंग नाहीत, हे आर्थिक फसवणुकीचे डिजिटल जाळे आहे. झटपट श्रीमंत होण्याच्या हव्यासात तरुण पिढी आपली बचत, आईवडिलांचे पैसे, घरी घेतलेले कर्ज हे सर्व या गेमिंगमध्ये घालवत आहे. दिवसेंदिवस ही संख्या वाढत असून, हे भविष्यातील सामाजिक स्फोटक ठरू शकते. या गंभीर बाबीकडे शासनाने आतापर्यंत फक्त बघ्याची भूमिका घेतली आहे, जी अत्यंत दुर्दैवी आहे. महाराष्ट्र राज्यात तत्काळ ऑनलाईन गेमिंग ॲप्सवर बंदी घालावी.

या माध्यमातून जुगार चालवणाऱ्या कंपन्यांवर गुन्हे नोंदवून कडक कारवाई करावी.

सेलिब्रेटी आणि जाहिरातदारांवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी.

तरुण पिढीला या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी राज्यस्तरीय जनजागृती मोहीम राबवावी.

आज जर आपण ठाम पावले टाकली नाहीत, तर उद्या संपूर्ण महाराष्ट्रात हजारो कुटुंबे या डिजिटल जुगारामुळे उध्वस्त झालेली असतील आणि त्याची जबाबदारी शासनावर राहील. आपण या विषयात तातडीने लक्ष घालून ठोस निर्णय घ्याल, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष सागर गुंजाळ यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# युवा व्यावसायिकांसाठी व विविध योजनांसाठी निधी मिळावा

### शिवाजी साळवे यांची मागणी; चर्मकार समाजाच्या प्रश्नाचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन

नगर – महाराष्ट्र शासनाकडून चर्मकार समाजातील होतकरू व्यावसायिकांसाठी १ हजार कोटीची तरतूद आहे, मात्र ही रक्कम कमी पडत असून समाजाला न्याय मिळत नाही. कर्ज प्रकरण मंजूर होऊनही लाभार्थ्यांना रकमेचा धनादेश मिळत नाही. महामंडळाचे अनेक चांगल्या योजना असून, निधी नसल्या कारणाने त्याचा फायदा चर्मकार समाजातील लाभार्थ्यांना होत नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहेत.



चर्मकार समाजातील होतकरू व्यावसायिकांसाठी असलेला निधी दुप्पट करावा, लाभार्थ्यांना मिळालेले कर्ज एका महिन्याच्या आत मिळावीत, कर्ज प्रकरणे मंजूर करुन तात्काळ धनादेश द्यावे, कोरोना काळामध्ये अनेक व्यावसायिकांचे व्यवसाय डबघाईला आले असून, २०१९ ते २०२४ पर्यंत लाभार्थ्यांचे व्याज माफ करावे, विविध कल्याणकारी योजनांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी चर्मकार संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

चर्मकार संघर्ष समितीच्या वतीने चर्मकार समाजाच्या विविध प्रश्नांचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन देण्यात आले. समितीचे संस्थापक अध्यक्ष शिवाजी साळवे यांनी विविध कल्याणकारी योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकांना मिळण्यासाठी निधी उपलब्ध होण्याबाबत ना. पवार यांचे लक्ष वेधले.

# अहिल्यानगर एमआयडीसीत 'ड्रायपोर्ट' संकल्पना राबवावी

### शहरात घरकुल योजना पूर्णपणे कार्यरत व्हावी : राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष केतन क्षीरसागर यांची निवेदनाद्वारे मागणी

नगर – राज्य सरकारने चालवलेली घरकुल योजना अत्यंत लाभदायक अशा पद्धतीने राज्यभर चालु असून गोर–गरीब तसेच सर्वसामान्य नागरिकांना याचा लाभ होत आहे. परंतु अहिल्यानगर शहरामध्ये तितक्या प्रभावीपणे कार्यरत नसून शहरातील नागरिकांना याचा लाभ मिळत नाही, तरी आपल्या आदेशानुसार मार्गदर्शनाखाली अहिल्यानगर शहरातील नागरिकांसाठी या योजनेची पूर्णपणे कार्यरत व्हावी अशी सूचना करुन यातून पूर्णपणे लाभ नागरिकांना घेता येईल अशी उपायोजना करावी.

त्याच बरोबर अहिल्यानगर जिल्हा हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने मोठा असून येथे कृषी उत्पादने व ३ एमआयडीसी असल्याने औद्योगिक उत्पादने निर्यात करण्यासाठी मोठा वाव आहे. परंतु दळणवळण सुविधा मालाची ये–जा करण्यासाठीचा खर्च जास्त होत आहे. तसेच वाहतुकीलाही वेळ जास्त लागत असल्याने नाशवंत माल निर्यात करण्यास अडचणी येतात. त्यामुळे कृषी व औद्योगिक क्षेत्राच्या वाढीस चालना मिळत नाही. या समस्येवर उपाययोजना राबविल्यास जिल्ह्याच्या कृषी व औद्योगिक क्षेत्रात अमूलाग्र बदल होऊ शकतो तसेच अनेक युवक–युवतींना रोजगार मिळू शकतो.

या विषयात लक्ष घालावे, असे निवेदन उपमुख्यमंत्री अजित पवार अहिल्यानगर दौऱ्यावर आले असता त्यांना राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष इंजि. केतन क्षीरसागर यांनी दिले.

यावेळी युवक प्रवक्ते किरण घुले, दीपक वाघ, विधानसभा अध्यक्ष सुमित कुलकर्णी, रोहित सरनाईक, राजू मकासारे, डॉ. केतन गोरे, डॉ. सुदर्शन गोरे, हृषीकेश जगताप, मंगेश शिंदे, कुणाल ससाणे, स्वप्नील कांबळे, ओंकार मिसळ, गौरव हार्बर, अरबाज शेख, शिवम कारले, केतन धवन, निरंजन निर्मल, आशुतोश पानमळकर, अमित बडे, प्रवीण खंडागळे, कृष्णा शेळके, सचिन बेरे आदी उपस्थित होते.


उपमुख्यमंत्री अजित पवार अहिल्यानगर दौऱ्यावर आले असता राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष इंजि. केतन क्षीरसागर यांनी त्यांचे स्वागत केले.

### सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय, भारत सरकारच्यावतीने

# नगर जिल्ह्यासाठी झोनल लीड सेंटर म्हणून सत्यम कॉम्प्युटर्सला मान्यता

नगर – सावेडी येथील सत्यम कॉम्प्युटर्सला ऑल इंडिया कौन्सिल फॉर प्रोफेशनल ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च अहिल्यानगर जिल्ह्यासाठी झोनल लीड सेंटर म्हणून मान्यता मिळाली. मान्यतेचे प्रमाणपत्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते सत्यम कॉम्प्युटर्सचे संचालक संजय मोरे पाटील यांना प्रदान करण्यात आले. यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम जगताप, संपत बारस्कर उपस्थित होते.


सत्यम कॉम्प्युटर्सला सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय भारत सरकार यांच्या वतीने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी AICPTR झोनल लीड सेंटर म्हणून मान्यता मिळाली. प्रमाणपत्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते स्वीकारताना सत्यम कॉम्प्युटर्सचे संचालक संजय मोरे पाटील.

ऑल इंडिया कौन्सिल ही संस्था वेळोवेळी आपल्या अभ्यासक्रमात सुधारणा व उद्योगांसाठी लागणारे अभ्यासक्रम समाविष्ट करून घेते, त्यामुळे AICPTR या संस्थेच्या शैक्षणिक अभ्यासक्रमात नेहमीच अद्यावतता असते. भारत सरकारच्या उपक्रमातून १९६९ मध्ये उपकरण उद्योग संघटनेच्या सेवेसाठी स्थापन केलेल्या, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय, भारत सरकारच्या – इन्स्टिट्यूट फॉर डिझाईन ऑफ इलेक्ट्रिकल मेजरींग इन्स्ट्रुमेंट्स तंत्रज्ञान केंद्रामार्फत ऑल इंडिया कौन्सिलची प्रशिक्षण सेवा प्रदाता म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

THE AICPTR ZEN च्या माध्यमातून अधिकृत केंद्रामध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांना कौशल्याभिमुख व्यावसायिक अभ्यासक्रम, भविष्यातील अभ्यासक्रम, उद्योजकताभिमुख अभ्यासक्रम व मार्गदर्शन कार्यक्रम तसेच माहिती तंत्रज्ञान (अल्पकालीन व दीर्घकालीन) अभ्यासक्रमांसाठी मूल्यांकन आणि प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय, भारत सरकारच्या IDEMI-MSME तंत्रज्ञान केंद्र मूल्यांकित अधिकृत प्रमाणपत्र राजमुद्रेसहित अशोक स्तंभावरील तीन सिंह असणार आहेत. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी याचा फायदा घ्यावा असे यावेळी संजय मोरे यांनी सांगितले.

# सन १९९५-९६ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांकडून रेसिडेन्शिअल शाळेला कृतज्ञतेची भेट सुपूर्द

नगर – रेसिडेन्शिअल हायस्कूल, अहिल्यानगर या शाळेत १९९० – ९१ ते १९९५ – ९६ या कालावधीत इयत्ता पाचवी ते दहावी या इयत्तेमध्ये शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांनी १३ जुलै रोजी झालेल्या स्नेह–मेळाव्याच्या निमित्ताने प्रेरणादायी उपक्रम राबवत शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने उत्कृष्ट दर्जाचे १० सिलिंग फॅन शाळेला भेट म्हणून दिले. यावेळी शाळेचे प्राचार्य विजयकुमार पोकळे यांच्याकडे हे १० फॅन सुपूर्द करण्यात आले.


प्राचार्य विजयकुमार पोकळे यांच्याकडे सिलिंग फॅन सुपूर्द करताना माजी विद्यार्थी अविनाश कराळे, सचिन ठोसर, राम नळकांडे, प्रशांत जगताप, आनंद सिसोदिया, मृणाल ठुबे, अनिता भगत, पर्यवेक्षक भाऊसाहेब पवार, शरद सोनवणे, उपमुख्याध्यापिका श्रीमती जयश्री दरे आणि धनंजय म्हस्के.

कार्यक्रमप्रसंगी बोलताना प्राचार्य विजयकुमार पोकळे म्हणाले की, रेसिडेन्शिअल हायस्कूल या शाळेत शिकलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रात चमकत असतात याचा आम्हाला कायम अभिमान वाटतो. आपल्या माध्यमिक शिक्षणाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत आपण जो आदर्श पायंडा पाडला आहे तो नक्कीच कौतुकास्पद आहे. शाळेसोबत असलेले आपले ऋणानुबंध आपण कायम ठेवावेत. शाळेमार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमात आपण सहभागी व्हावे, असे आवाहन पोकळे यांनी यावेळी केले.

यावेळी १९९० – ९१ ते १९९५ – ९६ च्या बॅचमधील माजी विद्यार्थी मृणाल ठुबे, अविनाश कराळे, सचिन ठोसर, राम नळकांडे, प्रशांत जगताप, आनंद सिसोदिया आणि अनिता भगत या माजी विद्यार्थ्यांचा शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.

माजी विद्यार्थी अविनाश कराळे यांनी मनोगत व्यक्त करताना, अनेक विद्यार्थ्यांना शालेय व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीनिमित्त बाहेरगावी स्थलांतरित व्हावे लागते तरीही शाळेप्रती असणारे प्रेम व स्नेह त्यांच्या मनात कायम असतो. आम्ही सर्वजण आज चांगल्या ठिकाणी पोहोचलो आहोत. कुणी चांगल्या नोकरीत तर कुणी स्वतःचा व्यवसाय उत्तम प्रकारे करत आहे. आज २९ वर्षांनी शाळेत आल्यानंतर शिक्षकांसमोर उभे राहिल्यानंतर छातीत धडधड झाल्याशिवाय राहत नाही. आज व्हॉट्सअप ग्रुपवर सर्वजण भेटत असले तरीही शाळेची भिंत, फळा, शिक्षकांनी लावलेली शिस्त या आठवणी आल्याशिवाय राहत नाहीत. आज आम्ही जे काही आहोत त्याचे सर्व श्रेय या शाळेला जाते. आमच्या बॅचने आपण शाळेचे काहीतरी देणे लागतो या सद्भावनेतून शाळेला 'गेट–टूगेदर' च्या माध्यमातून जी काही भेट दिली ती भेट गुरुदक्षिणा दिल्यासारखी आहे. जुन्या आठवणींना उजाळा देताना शाळेतील सध्याचा बदल पाहून खूप आनंद होतोय, अशा भावना कराळे यांनी व्यक्त केल्या.

या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक विजयकुमार पोकळे, पर्यवेक्षक भाऊसाहेब पवार, शरद सोनवणे, उपमुख्याध्यापिका श्रीमती जयश्री दरे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनंजय म्हस्के यांनी केले. मृणाल ठुबे यांनी आभार मानले.

# अंगणवाडीतील मुलांना लोहयुक्त बिस्कीट मेजवानी

### इंदू केअर फार्माचा नगर तालुक्यातील तीन गावांत उपक्रम

नगर – आयुर्वेदिक औषधांची निर्मिती करणार्या जेजुरीतील इंदू केअर फार्मा कंपनीने नागली, ज्वारी व बाजरीच्या पिठापासून तयार केलेल्या लोहयुक्त बिस्किटांची मेजवानी नगर तालुक्यातील दशमी गव्हाण, सांडवा व कोल्हेगाव या गावांतील अंगणवाडी मुलांना नुकतीच मिळाली. यावेळी गावातील गरोदर महिला व कुपोषित मुले आणि वृद्धांनाही ही बिस्किटे भेट देण्यात आली. अंगणवाडीतील मुलांना ही बिस्किटांची मेजवानी आवडल्याने कंपनीचे मुख्य वितरक ओंकार एन्टरप्राईजेसचे संचालक नानू वल्लाकट्टी यांच्या हस्ते दशमी गव्हाणचे सरपंच उद्धव कांबळे यांच्याकडे आणखी ही बिस्किटे देण्यात आली.

मैदा वगळून फक्त नागली, ज्वारी व बाजरीचे पीठ, गुळ व आयुर्वेदिक औषधी वनस्पतींच्या मिश्रणातून या बिस्किटांची निर्मिती करण्यात आली आहे. अन्न व औषध प्रशासनाकडून व प्रयोगशाळांतून या बिस्किटांची तपासणी करण्यात आली आहे. अन्न व औषध प्रशासनाने या बिस्किटांना मान्यता दिल्याने त्यांचे विक्री–वितरण सुरू करण्यात आले आहे. सामाजिक बांधिलकीचा भाग म्हणून या बिस्किटांची भेट गावा–गावातील अंगणवाडी मुलांसह गरोदर माता व वृद्धांना देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.


अंगणवाडीतील मुलांसाठी लोहयुक्त बिस्किटे ओंकार एन्टरप्राईजेसचे संचालक नानू वल्लाकट्टी यांच्या हस्ते दशमी गव्हाणचे सरपंच उद्धव कांबळे यांच्याकडे आणखी ही बिस्किटे देण्यात आली.

नगर तालुक्यातील कोल्हेवाडी, सांडवा व दशमी गव्हाण येथील अंगणवाड्यांतून वितरण केल्यावर व तेथील मुलांकडून बिस्किटांना पसंती आल्यावर या गावांतील ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी आणखी बिस्किटांची मागणी केली. ती नुकतीच वल्लाकट्टी यांच्या हस्ते त्यांना देण्यात आली. यावेळी दशमी गव्हाणचे सरपंच उद्धव कांबळे, उपसरपंच बाबासाहेब काळे, माजी सैनिक काशिनाथ काळे, मेजर भाऊसाहेब पवार, दशमी गव्हाणच्या ग्रामसेविका एस. बी. वीर, सांडव्याच्या ग्रामसेविका डी. एम. गायकवाड आदी उपस्थित होते.

नागली, ज्वारी व बाजरी पीठ, गुळ यासह आयुर्वेदिक औषधींतून कॅलरिज व फायबरचा समावेश या बिस्किटांमध्ये असल्याचे वल्लाकट्टी यांनी सांगितले. शासनाद्वारे शाळांतून दिल्या जाणाऱ्या पोषण आहार योजनेत या बिस्किटांचा समावेश होण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

विविध गावांतील अंगणवाडी बालके, गरीब मुले व गरोदर महिलांना या बिस्किटांचे वाटप करण्याचे नियोजन असून, याबाबत अधिक माहितीसाठी ९४०५०००५५१ यावर संपर्क साधण्याचे आवाहन वल्लाकट्टी यांनी केले.


वृक्षमित्र विजय भालसिंग यांना भारत गौरव सन्मान देताना डॉ.प्रा.बी.एन. खरात, अभिनेते तेजस बर्वे आदी.

# भारत गौरव सन्मान पुरस्काराने विजय भालसिंग सन्मानित

नगर – येथील वृक्षमित्र विजय भालसिंग यांना पुणे येथील पत्रकार भवन येथे समृद्धी प्रकाशनचे डॉ.प्रा.बी.एन. खरात, शांताई फाऊंडेशन पुणे व हिरकणी महिला विकास संस्था, कोरेगाव भिमा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात अभिनेते तेजस बर्वे यांच्या हस्ते भारत गौरव सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला.

वाळकी (ता. नगर) येथील असलेले विजय भालसिंग एसटी बॅंकेची नोकरी सांभाळून निस्वार्थपणे कार्यरत असून, कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान व वर्गणी न घेता स्वखर्चातून सामाजिक कार्य करत आहे. वृक्षरोपण व संवर्धनासाठी ते सातत्याने योगदान देत आहे.

उन्हाळ्यात पशु–पक्ष्यांना जगणे सुसह्य व्हावे म्हणून पाणवठे तयार करुन पाणी उपलब्ध करणे, विविध परिसरात पक्ष्यांसाठी झाडांवर धान्य व पाण्याची भांडी बसविणे, सर्वत्र वाढत चाललेल्या सिमेंटच्या जंगलामुळे पशु–पक्ष्यांचे अस्तित्व राहण्यासाठी नारळाच्या साली पासून कृत्रिमरीत्या पक्ष्यांसाठी बनवलेले घरटी बसविणे आदी निसर्ग व पर्यावरणपुरक उपक्रम ते सातत्याने राबवित आहेत. दरवर्षी आषाढी वारीला जाणाऱ्या वारकऱ्यांच्या दिंडीची सेवा करत आहे. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना पुणे येथील मानाचा भारत गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. वेस्टर्न इंडिया सिए असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची पेमराज सारडा महाविद्यालयास भेट दिली.

